www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक **लोकरक्षणाय**

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ४६ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, रविवार, २३ जून २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

# ठाणे महानगरपालिकेने प्रथमच तयार केला पूरस्थितीचा सामना करण्यासाठी पूर जोखीम व्यवस्थापन आराखडा

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते झाले प्रकाशन

● ठाणे, रोहित जैसवाल :



ठाणे महापालिका क्षेत्रातील पूर जोखीम व्यवस्थापनासाठी तयार करण्यात आलेल्या ठाणे शहर कृती आराखडा २०२४चे प्रकाशन शनिवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले. हा आराखडा राज्य सरकार आणि कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोन्मेंट अँड वॉटर (सीईईडब्ल्यू) या आघाडीच्या थिंक टँकच्या सहयोगाने विकसित करण्यात आला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील पूरग्रस्त भागांना प्राधान्य देऊन पूरस्थितीचा सामना करण्यासाठी तयार राहणे आणि जलद प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणेला सुसज्ज करण्याची दिशा मिळणे हा या कृती आराखड्याचा प्रमुख उद्देश आहे.

पूर जोखीम व्यवस्थापनासाठी 'सीईईडब्ल्यू' या संस्थेने तयार केलेला ठाणे शहर कृती आराखडा २०२४ हा सर्वसमावेशक आहे. त्यासाठी संस्थेने अतिशय मेहनत घेतली आहे. अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) आणि ठाणे जिल्ह्याच्या पालक सचिव सुजाता सौनिक यांनी यासंदर्भात पुढाकार घेतला. त्यातून तयार झालेल्या या कृती आराखड्यामुळे ठाणे महापालिकेच्या यंत्रणेला सुप्रशासनासाठी मदत होणार आहे, असे प्रतिपादन या प्रकाशन कार्यक्रमात महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे. यावेळी, नागरिकांना या कृती आराखड्याची माहिती व्हावी यासाठी तयार करण्यात आलेल्या पोस्टरचेही प्रकाशन करण्यात आले.

ठाणे महापालिका क्षेत्राचा विकास होत असताना नैसर्गिक नाल्यांची स्थिती आमूलाग्र बदलली आहे. त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने विचार करून भूमिगत मल:निसारण वाहिन्यांचे जाळे उभारण्याचे मोठे आव्हान आता महापालिकेसमोर उभे आहे. त्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी 'सीईईडब्ल्यू' या संस्थेने महापालिकेसाठी तयार केलेला हा कृती आराखडा दिशादर्शक म्हणून काम करेल. नवीन प्रकल्प करताना, डीपीची अमलबजावणी करताना या कृती आराखड्यातील मुद्दे विचारात घेऊनच निर्णय घेतले जातील, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

पान २ वर

# एकदाची जातनिहाय जनगणना करुन टाका: उदयनराजे भोसले

● सातारा, नितीन देवळेकर :

राज्यात सध्या मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन वातावरण प्रचंड तापले आहे. या पार्श्वभूमीवर उदयनराजे भोसले यांनी जातनिहाय जनगणनेची मागणी केली आहे. मी जात पात मनात नाही. पण मराठा आरक्षणप्रश्नी २३ मार्च १९९४चा अध्यादेश हा कळीचा मुद्दा आहे. त्यात मराठ्यांना डावलून माळी, धनगर, वंजारी असे सर्वांना आरक्षण देण्यात आले. त्यामुळे सध्या जातीजातीत तेढ निर्माण झाला असून दिवसेंदिवस जाती जातीत दुफळी माजत असल्याचे खा. उदयनराजे भोसले यांनी कोरेगाव येथे आपल्या भाषणात सांगितलं आहे. त्यामुळे एकदाची जातनिहाय जनगणना



करून ज्यांना त्यांना वाट्याप्रमाणे आरक्षण देऊन टाकावे, अशी रोखठोक भूमिका खासदार उदयनराजे भोसले यांनी मांडली.

सध्या जालन्यातली वडीगोद्री येथे सध्या लक्ष्मण हाके यांचे उपोषण सुरु आहे. त्यांच्या उपोषणाचा आजचा 10 वा दिवस आहे. त्यांना भेटण्यासाठी राज्य सरकारचे शिष्टमंडळ वडीगोद्री येथे दाखल झाले आहे. या शिष्टमंडळात छगन भुजबळ, धनंजय मुंडे, गिरीश महाजन, अुतल सावे यांच्यासह १२ जणांचा समावेश आहे. हे सर्वजण आता लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांची मनधरणी करणार आहेत. तर दुसरीकडे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे हेदेखील आक्रमक झाले आहेत. आपण कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नाही. वेळ पडल्यास मराठा आरक्षणासाठी बलिदान देऊ, असा निर्धार मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला आहे.

लोकशाही मार्गाने आंदोलन करणे हा ज्याचा त्याचा अधिकार आहे. पण हिंसा, गावबंदी करणे चुकीचे आहे, परंतु असे केल्याने उपोषणकर्त्यांचा आंदोलकणाच्या विरोधात जनमत जात असते. पान २ वर

# राहुल नार्वेकर यांना सत्र न्यायालयाचा दणका
# ३ हजारांचा दंड ठोठावला

● मुंबई, विशाल कारंडे :

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना मुंबई सत्र न्यायालयाकडून दंड ठोठावण्यात आला आहे. राहुल नार्वेकर हे सुनावणीसाठी सतत गैरहजर राहिल्यानं न्यायालयाने राहुल नार्वेकर यांना ३ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात, कोरोनाकाळात वीज दरवाढीविरुद्ध भाजपनं आंदोलन केलं होतं. या आंदोलनात बेस्टच्या महाव्यवस्थापकांना मारहाण झाली होती. याचप्रकणात भाजपच्या २० पदाधिकाऱ्यांविरुद्ध मुंबई सत्र



न्यायालयात खटला सुरू आहे. ज्यांच्यावर खटला सुरु आहे, त्यामध्ये राहुल नार्वेकर यांचंही नाव आहे. मात्र राहुल नार्वेकर हे सातत्याने सुनावणीसाठी गैरहजर राहिले. त्यामुळे मुंबई सत्र न्यायालयाने राहुल नार्वेकर यांना ३ हजार रुपयांचा दंड ठोठावला. दरम्यान आता येत्या ८ जुलैला पुढील सुनावणीला हजर राहण्याचे आदेश कोर्टाकडून जारी करण्यात आले आहेत.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात २०२० मध्ये भाजपने अनेक ठिकाणी आंदोलनं केली होती. कधी मंदिरं उघडण्यासाठी तर कधी वीज दरवाढीविरोधात आंदोलनं करण्यात येत होती. मुंबई भाजपने वीजदरवाढीविरोधात आंदोलन केलं होतं. कोरोना काळात अनेकांच्या नोकऱ्या गेल्या होत्या, सर्व बंद असूनही बेस्ट प्रशासनाने भरमसाठी वीज बिले पाठवल्याचा आरोप भाजपचा होता.

पान २ वर

# राज्य सरकारच्या आश्वासनानंतर लक्ष्मण हाकेंचे उपोषण स्थगित

## अधिवेशन काळात सर्वपक्षीय बैठकीचे नियोजन

● जालना, सचिन कदम :

गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेले ओबीसी आरक्षण बचाव उपोषण अखेर लक्ष्मण हाके यांनी अखेर संपवलं आहे. ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लागणार नाही, तसेच ओबीसी आरक्षणासंबंधी लक्ष्मण हाके यांच्या मागणीवर राज्य सरकार सकारात्मक असल्याचं आश्वासन मिळाल्यानंतर त्यांनी हे आंदोलन मागे घेतलं आहे. छगन भुजबळांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या मंत्र्यांचे एक शिष्टमंडळ लक्ष्मण हाके यांच्या भेटीला गेले होते. त्यावेळी या शिष्टमंडळाने आरक्षणावर राज्य सरकारची काय भूमिका आहे याची माहिती हाके यांना दिली. त्याचवेळी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी आपले उपोषण मागे घ्यावं अशी विनंती या



शिष्टमंडळाकडून करण्यात आली.

बोगस सर्टिफिकेट देणाऱ्यांवर आणि घेणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचं राज्य सरकारने आश्वासन दिलं. त्यावर श्वेतपत्रिका काढावी आणि ते जाहीर करावं.

या सरकारकडून न्यायाची अपेक्षा आहे. पंचायत राजच्या निवडणुका आता ओबीसी आरक्षण देऊन घेणार की त्याशिवाय घेणार हे शासनाने स्पष्ट करावं. पान २ वर

# मेट्रो '२ बी'च्या मार्गात म्हाडा इमारतींचे अडथळे

● मुंबई, दिगंबर जाधव :

मंडाले ते डी. एन. नगर मेट्रो २ बी मार्गिकेच्या कामात अडथळा ठरणाऱ्या नेहरूनगर आणि जेव्हीपीडी येथील म्हाडाच्या इमारती अद्याप मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ताब्यात आल्या नाहीत. त्यातून या भागातील मार्गिकेच्या उभारणीचे काम रखडले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत यावर तोडगा न निघाल्यास एमएमआरडीएकडून या इमारतींच्या जमिनीचे अधिग्रहण केले जाणार आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

मेट्रो २ बी मार्गिकेला नेहरूनगर



येथील अजिंक्यतारा रहिवासी सोसायटी आणि जेव्हीपीडी येथील गुलमोहर सोसायटी या दोन इमारती अडथळा ठरत आहेत. त्यातील अजिंक्यतारा इमारतीत १२० रहिवासी, तर गुलमोहर सोसायटीत ४० रहिवासी वास्तव्याला आहेत. या इमारतींचा पुनर्विकास म्हाडाने करावा यासाठी एमएमआरडीएकडून प्रयत्न केले जात होते.

'या' कारणांमुळे विलंब-

१) सद्य:स्थितीत या मेट्रो मार्गिकेचे ६८ टक्क्यांहून अधिक कामे पूर्ण झाली आहेत. मात्र, या इमारती रिकाम्या झाल्या नसल्याने या भागातील मार्गिकेचे काम करणे एमएमआरडीला शक्य झाले नाही.

२) एमएमआरडीएच्या २०२० मधील नियोजनानुसार मेट्रो २ बी मार्गिकेचे काम ऑक्टोबर २०२२ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते. या मेट्रो मार्गिकेसाठी काही जागा मिळण्यात आलेल्या अडचणी, कंत्राटदार बदलावा लागल्याने प्रकल्पाला विलंब झाला आहे. अद्यापही मेट्रो मार्गिकेचे काम पूर्ण होण्यास जून २०२५ उजाडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### इमारती अद्याप रिकाम्या केलेल्या नाहीत

■ इमारतींच्या या पुनर्विकासाला रहिवाशांनी विरोध दर्शविला होता. नेहरूनगर येथील इमारत रहिवाशांनी स्वतः पुनर्विकास करण्याचे ठरविले होते. मात्र हा प्रकल्प अद्याप मार्गी लागला नसल्याने या दोन्ही इमारती अद्याप रिकाम्या केलेल्या नाहीत. मेट्रो मार्गिकेच्या कामासाठी आवश्यक असलेली या भागातील जागा अद्याप एमएमआरडीएच्या ताब्यात आलेली नाही. त्यातून आता प्रकल्प पूर्णत्वासाठी एमएमआरडीएकडून ही जमीन अधिग्रहण केली जाणार आहे. तशा सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# महाराष्ट्रात पेशवाई आणण्याचा प्रयत्न कदापी खपवून घेतला जाणार नाही: नाना पटोले

■ दलित समाजाविरोधात नाशिकमध्ये पत्रकबाजी करणाऱ्याच्या मुसक्या आवळून अद्दल घडवा.
■ आरक्षणप्रश्नी भाजपाकडून मराठा आणि OBC समाजाची फसवणूक, देवेंद्र फडणवीस व चंद्रकांत बावनकुळेंची वेगवेगळी भूमिका.

● नाशिक, सचिन कदम :

नाशिकमध्ये दलित समाजाविरोधात पत्रके वाटण्यात आली असून चातुर्वर्ण्य व्यवस्था आणण्याचा हा प्रयत्न दिसत आहे. शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात सामाजिक द्वेष पसरवणारे जातीवाचक प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. काही विकृत्त प्रवृत्ती महाराष्ट्रातील वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत पण तो यशस्वी होऊ दिला जाणार नाही. पत्रकातील भाषा पाहता महाराष्ट्रात पेशवाई आणण्याचा काही समाज विघातक लोकांचा प्रयत्न दिसत



आहे पण तो हाणून पाडू, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

पुणे येथे पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपा सरकारवर सडकून टीका केली, ते पुढे म्हणाले की, नाशिकमध्ये दलित समाजाच्या विरोधात वाटण्यात आलेले पत्रक हा या समाजाचा अपमान करणारे आहे. अशा प्रकारच्या घटना सरकारच्या आशिर्वादाने होत असतील तर त्या तातडीने थांबवा आणि ज्यांनी हे पाप केले आहे त्यांच्या मुसक्या आवळून कठोर शिक्षा करा. या पत्रकारावर पत्रक प्रसिद्ध करणाऱ्याचे नावही आहे. राज्य सरकारने या प्रकरणात तातडीने लक्ष घालून अशा प्रवृत्तींना ठेचून काढले पाहिजे. काँग्रेस पक्ष या प्रकारच्या प्रवृत्तीचा तीव्र निषेध करत आहे, असेही नाना पटोले म्हणाले.

पान २ वर

## बलिदान देण्याची वेळ आली तरी घाबरणार नाही, मराठा समाजावर अन्याय होऊ देणार नाही : मनोज जरांगे

● मुंबई, दिगंबर जाधव :



मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच पेटत चालला आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देऊ नये या मागणीला घेऊन ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचे प्राणांतिक उपोषण सुरु आहे. तर दुसरीकडे कोणत्याही परिस्थितीत मी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण मिळवून देणार, असे मराठा आरक्षणासाठी झगडणारे मनोज जरांगे म्हणत आहेत. आज मनोज जरांगे यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी मराठा आरक्षणाचा मुद्दा आणि ओबीसी नेत्यांचा त्याला होणारा विरोध यावर भाष्य केलंय. त्यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर सडकून टीका केली. दरम्यान, लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे) यांच्या उपोषणाचा आजचा दहावा दिवस आहे.

## थोडक्यात




### जूनच्या शेवटच्या आठवड्यात मान्सून होणार सक्रिय

● मुंबई, दिगंबर जाधव :

मुंबईसह राज्यभरात काही ठिकाणी बरसणारा, तर काही ठिकाणी पूर्णत: उघडीप घेतलेला मान्सून आता जूनच्या शेवटच्या आठवड्यात सक्रिय होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे; तसेच राज्याच्या बहुतांश भागांत चांगला पाऊस होईल, अशी शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली असून, यानुसार चांगला पाऊस पडला, तर उकाड्याने हैराण झालेल्या मुंबईकरांना दिलासा मिळणार आहे.

पान २ वर

### अंडरवर्ल्ड डॉन छोटा शकीलचा मेहुणा आरिफ अबू बकर शेखचा जे जे रुग्णालयात मृत्यू



● मुंबई, विशाल कारंडे :

कुख्यात गुंड छोटा शकीलचा मेहुणा आरिफ अबुबकर शेख उर्फ भाईजान याचं सर जे. जे. रुग्णालयात निधन झालं. फेब्रुवारी २०२२ मध्ये मीरा रोड इथून एनआयए या केंद्रीय तपास संस्थेनं त्याला अटक केली होती. छातीत दुखत असल्यानं त्याला जे जे रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### रामलल्लाची प्राण प्रतिष्ठा करणारे मुख्य पुजारी लक्ष्मीकांत दीक्षित यांचं निधन



● वाराणसी, प्रगती शर्मा :

जानेवारी महिन्यात रामलल्लाची प्राण प्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी असणारे मुख्य पुजारी लक्ष्मीकांत दीक्षित यांचं शनिवारी (२२ जून) वयाच्या ९०व्या वर्षी निधन झालं. ते गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. लक्ष्मीकांत दीक्षित हे मूळचे महाराष्ट्रातील सोलापूरचे असले तरी त्यांचं कुटुंब गेल्या अनेक पिढ्यांपासून काशी येथे वास्तव्यास आहे. पान २ वर

### अमर महल ते वडाळा जलबोगद्याचा ब्रेक थ्रू यशस्वी



● मुंबई, दिगंबर जाधव :

अमर महल ते वडाळा व पुढे परळपर्यंतच्या ९.७ किलोमीटर लांबीच्या जलबोगद्याचे खोदकाम 'टीबीएम' यंत्राद्वारे पूर्ण झाले आहे. या भूमिगत जलबोगदा प्रकल्पांतर्गत वडाळा ते परळदरम्यान ५.२५ किलोमीटर लांबीच्या दुसऱ्या टप्प्याच्या जलबोगद्याचा 'ब्रेक थ्रू' शुक्रवारी मुंबई महापलिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या हस्ते करण्यात आला. पान २ वर

## संपादकीय

# नव्या सरकारकडून माफक अपेक्षा

लोकशाहीचा उत्सव सोहळा संपला. निकाल जाहीर झाले. बाजारात गिऱ्हाईक हाच खरा असतो; तसेच लोकशाही प्रक्रियेत मतदार बरोबर असतो. अर्थात जे बरोबर ते योग्य असेल की नाही हा वेगळा वादाचा विषय. पण मतदाराचा कौल मानलाच पाहिजे. या प्रक्रियेत मग आपण बिर्याणी ऑर्डर केली पण नशिबी खिचडी आली असेही होऊ शकते. जसे की यावेळी झाले आहे. जे झाले ते का झाले, कुणाचे काय, कुठे चुकले हा राजकारणी पंडितांचा अभ्यासाचा विषय. इथे आता येणाऱ्या सरकारने काय करायला हवे, साधारण जनतेच्या काय अपेक्षा आहेत, असतील त्याचा हा लेखाजोखा ! तसे प्रत्येक पक्ष निवडणुकीच्या आधी आपला जाहीरनामा, वचननामा प्रसिद्ध करतात. पण सरकार काय देणार, अन् जनतेला काय हवे यात फार फरक असतो. जनतेला काय हवे यापेक्षा भविष्यात कशाची जास्त गरज आहे, कशाला प्राधान्य द्यायला हवे ते पाहू या. सर्वात प्राधान्य हवे ते शिक्षणाला. अगदी प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत आपल्याकडे गुणवत्तेच्या बाबतीत आनंदी आनंद आहे. संख्या भरपूर वाढली. पण बाजारीकरणामुळे गुणवत्ता तितकीच घसरली हे सत्य. नवे / राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आले खरे. पण ते अहवाल, फायली यांपुरतेच. त्यातल्या अनेक बाबी आधीही होत्या. अगदी शांतिनिकेतन काळापासून होत्या. हे धोरण राष्ट्रीय आहे का? तर तेही नाही. कारण अनेक राज्यांनी त्याकडे चक्क पाठ फिरवली आहे. इतर ठिकाणी या धोरणावर चर्चा, कार्यशाळा, परिसंवाद असे सोहळे सुरू आहेत. अंमलबजावणीबाबत आनंदी आनंद अशी परिस्थिती आहे. खरी गरज उत्तम शिक्षकाची आहे. सरकारी शाळांतील सुविधा, तेथील शिक्षकाची संख्या, उपलब्धता, त्यांचा दर्जा हा गंभीर काळजीचा विषय. तीच परिस्थिती महाविद्यालये, विद्यापीठे, आयआयटी, एनआयटी अशा उच्च शिक्षण संस्थांत आहे. हव्या त्या संख्येने योग्य त्याच व्यक्तींची केवळ गुणवत्तेच्या आधारे नियुक्ती, त्यांना सातत्याने प्रशिक्षण हे सारे शिक्षक, प्राध्यापक यांच्याबाबतीत प्राधान्याने गरजेचे आहे.

शिक्षण क्षेत्राबरोबर आरोग्य सेवा, न्यायसंस्था सुधारणेदेखील फार गरजेचे आहे. अजूनही सरकारी दवाखान्यातील परिस्थिती दयनीय आहे. पुरेसे डॉक्टर्स नाहीत. नर्सेस नाहीत, स्वच्छता नाही, मेडिकल उपकरणे नाहीत, इमर्जन्सी व्यवस्था नाही अशी परिस्थिती आहे. खेड्यापाड्यात तर कुपोषण, स्वच्छता, बेसिक आरोग्य व्यवस्था गरिबांना अजूनही उपलब्ध नाही. शहरांतील कॉर्पोरेट हॉस्पिटले महागडी, लुटारू वृत्तीची आहेत ! गरीब स्त्रिया, बालके यांच्या आरोग्य सुविधांकडे प्रामुख्याने लक्ष पुरवायला हवे.

प्रत्येक सुविधेला मोल हवेच. धान्य फुकट, वीज पाणी फुकट अशा प्रलोभनांमुळे माणसे आळशी होतात. निरुद्योगी माणसे समाजाला घातक ठरतात. गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते. त्यापेक्षा सर्वांना काही ना काही काम द्या. अनेक क्षेत्रांत मनुष्यबळाची प्रचंड गरज आहे. तिथे बेरोजगार तरुणांना रोजगार द्या. हवे ते प्रशिक्षण द्या. कष्टाने कमावल्याचा आनंद मिळू द्या. फुकट्या सवलतीमुळे मोर्चे, आंदोलने येथील गर्दी, गुन्हेगारी वाढते आहे. माणसाच्या आवश्यक गरजा पुरवण्याइतकी कमाई ज्याची त्याने केलीच पाहिजे. आपल्याला उद्योगी तरुण पिढी निर्माण करायची आहे. आळशी नाही. प्रलोभनामुळे मिळणारा आनंद तात्कालिक असतो. शाश्वत नसतो. न्याय संस्थेतील दिरंगाई वाढतेच आहे. वर्षानुवर्षे लाखो केसेस प्रलंबित राहतात. वेळ, पैसा वाया जातो. योग्य वेळात योग्य न्याय मिळाला तर त्याला काही अर्थ. कायद्याचा समाजात धाक निर्माण झाला पाहिजे. विशेष करून राजकारणी, लोकप्रतिनिधी हे नैतिक दृष्ट्या स्वच्छच असले पाहिजेत. निवडणुकीला उभे राहणारे कितीतरी प्रतिनिधी गुन्हेगारी प्रवृत्तीचे असतात. तुरुंगात शिक्षा भोगून आलेले सत्तेत येतात. यावर कायद्याचा, न्याय संस्थेचा निर्बंध हवा. 'राजकारणी मंडळींविरुद्ध खोटे गुन्हे दाखल होतात' ही पळवाट चालणार नाही. आधी दोषमुक्त व्हा अन् मगच सत्तेत, राजकारणात येण्याचा विचार करा. या पुढाऱ्यांच्या निवडणुकीच्या अर्जाबरोबर कोट्यवधी रुपयांच्या संपत्तीची विवरणे सादर होत असतात. हे करोडो रुपये कुठून येतात, कसे येतात, व्यवसाय काय, हजारो एकर जमीन यांच्या नावे आली कशी याचा न्यायसंस्थेने आधी तपास करायला हवा. निवडणूक आयोगानेदेखील लेखाजोखा नीट तपासायला हवा. सामान्य शिकल्या सवरलेल्या व्यक्तीला कष्ट करूनही एवढी संपत्ती गोळा करता येत नाही. मग या मंडळींची जादू काय याचा तपास करणारी सक्षम यंत्रणा हवी. प्रत्येकाने कायदे पाळलेच पाहिजेत. न्याय संस्थेने जमाखोरीवर विशेष लक्ष, नियंत्रण ठेवले पाहिजे.

अनेक पुढारी दोन ठिकाणांहून निवडणूक लढवताना दिसतात. हा सरकारी पैशाचा, यंत्रणेचा अपव्यय आहे. पुन्हा निवडणूक घेण्याचा खर्च सरकारने का करावा? कायदा बदलून हे थांबवायला हवे. प्रत्येक प्रतिनिधीसाठी शैक्षणिक पात्रता निश्चित करावी. ज्यांना नीट संवाद साधता येत नाही, कायद्याचे ज्ञान नाही, अभ्यास नाही तेच कायदे करणार, सरकार चालवणार हे हास्यास्पद वाटते.



## आजची चित्रोळी

१.लपून बसतो दगडाखालीं
नसती मजला पंख !
तांवडीत जर सांपडलात
लक्षांत येईल डंख !!
२. डंख मारतो आम्हीं त्यांना
छेडले कोणी तर !
सारे म्हणती बिऱ्हाड आमुचे
असते पाठीवर !

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### ठाणे महानगरपालिकेने प्रथमच तयार केला...

या आराखड्यामुळे पालिकेची जबाबदारी वाढली आहे. आता हा आराखडा नागरिकांपर्यंत घेऊन जाऊन त्यांच्याशी संवाद साधण्याचा उपक्रम महापालिका करेल, असेही आयुक्त राव म्हणाले. तसेच, उष्णतेचा सामना करण्यासाठी तयार केलेल्या कृती आराखड्यापाठोपाठ हा पूर जोखीम व्यवस्थापन आराखडा तयार झाला आहे. आता पाण्याचा पुर्नवापर करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात येत असल्याचेही यावेळी आयुक्त राव यांनी सांगितले.

ठाणे या किनारपट्टीवरील शहराला प्रतिकूल हवामान घटनांपासून सुरक्षित ठेवणे महत्त्वाचे आहे. हवामान बदलामुळे शहरात वारंवार होणाऱ्या पूरस्थितीला प्रतिसाद देण्यासाठी महापालिका आणि सीईईडब्ल्यूने शहर-स्तरीय पूर कृती आराखडा तयार केला. त्यासाठी गेल्या ५२ वर्षांमधील पर्जन्यमानाची आकडेवारी, सामाजिक-आर्थिक घटक आणि वॉर्ड स्तरावर पूरांमुळे होणारे धोके ओळखण्यासाठी सॅटेलाइट माहिती याचे विश्लेषण करण्यात आले आहे. या आराखड्यात कृतीची आवश्यकता, त्वरित उपाययोजनांची अंमलबजावणी, त्यासाठी कालमर्यादा निश्चिती आदी बाबींचा समावेश आहे. भारतीय हवामान खात्याने यावर्षी सरासरीपेक्षा जासूत पावसाचा अंदाज वर्तवला असल्याने ही तयारी महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन सीईईडब्ल्यूचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी नितीन बस्सी यांनी याप्रसंगी केले.

या प्रकाशन कार्यक्रमास, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) तुषार पवार, उपायुक्त (उद्यान) सचिन पवार, परिवहन सेवेचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, सीईईडब्ल्यूचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी विश्वास चितळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. चेतना नितील, डॉ, राणी शिंदे, उपनगर अभियंता विकास ढोले, गुणवंत झांबरे, कार्यकारी अभियंता सुधीर गायकवाड, वरिष्ठ उद्यान निरिक्षक केदार पाटील, अधिष्ठाता डॉ. राकेश बारोट, डॉ. अनिरुद्ध माळगावकर, डॉ. प्रसाद पाटील उपस्थित होते.

### जूनच्या शेवटच्या आठवड्यात मान्सून होणार...

पुणे हवामानशास्त्र विभागाचे प्रमुख कृष्णानंद होसाळीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील चार आठवड्यांचा मान्सूनचा अंदाज हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. त्यानुसार, राज्याच्या बहुतांश भागांत पावसाची स्थिती सुधारेल. शिवाय पावसात हळूहळू वाढ होईल. शिवाय जूनच्या शेवटच्या आठवड्यात पावसात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

२४ आणि २५ जून रोजी शहर आणि उपनगरात मुसळधार पावसाची शक्यता आहे, अशी माहिती हवामान विभागाच्या वतीने देण्यात आली.

### अंडरवर्ल्ड डॉन छोटा शकीलचा मेहुणा आरिफ...

जे. जे. रुग्णालयात मृत्यू : आरिफ भाईजान हा कुख्यात गुंड छोटा शकीलचे मुंबई तसंच महाराष्ट्रातील सर्व व्यवहार सांभाळत होता, अशी माहिती सूत्रांनी दिली. मुंबईतील आर्थर रोड तुरुंगात असलेल्या आरिफला शुक्रवारी (२१ जून) सायंकाळी अचानक अस्वस्थ वाटू लागल्यानं त्याला तुरुंग प्रशासनानं सायंकाळी ७ वाजता मुंबईतील जे. जे. रुग्णालयात दाखल केलं होत. उपचार सुरू असताना सायंकाळी ७:३० वाजता त्याचा मृत्यू झाल्याचं डॉक्टरांनी घोषित केलं.

### रामलल्लाची प्राण प्रतिष्ठा करणारे मुख्य...

वाराणसीच्या विद्वानांमध्ये पंडित लक्ष्मीकांत दीक्षित यांचं अनन्यसाधारण स्थान होतं. पंडित लक्ष्मीकांत दीक्षित यांच्याकडं काशीच्या विद्वान परंपरेचं प्रतीक म्हणून पाहिलं जात असे.

काकांकडून घेतली वेद आणि विधींची दीक्षा : लक्ष्मीकांत दीक्षित हे वाराणसीच्या मीरघाट येथील सांगवेद महाविद्यालयाचे वरिष्ठ शिक्षक होते. काशीच्या राजाच्या मदतीनं सांगवेद महाविद्यालयाची स्थापना झाली. पंडित लक्ष्मीकांत यांची काशीतील यजुर्वेदाच्या उत्तम विद्वानांमध्ये गणना होते. पूजेच्या पद्धतीतही त्यांचं प्राविण्य होतं. लक्ष्मीकांत दीक्षित यांनी त्यांचे काका गणेश दीक्षित भट्ट यांच्याकडून वेद आणि विधींची दीक्षा घेतली होती.

पंडित गागा भट्ट यांचे वंशज : पंडित लक्ष्मीकांत यांचे पूर्वज प्रसिद्ध पंडित गागा भट्ट होते. गागा भट्ट यांनी १७व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक केला होता. तर पंडित लक्ष्मीकांत दीक्षित यांच्या अध्यक्षतेखाली १२१ पंडितांनी मिळून १६ जानेवारीपासून प्राणप्रतिष्ठेचा विधी केला होता. काशीतील ४० हून अधिक विद्वान या संघात सामील झाले होते. राम मंदिरातील पूजा पूर्ण झाल्यानंतर गर्भगृहात मुख्य पुजारी म्हणून लक्ष्मीकांत दीक्षित यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आशीर्वाद दिला. यावेळी पंतप्रधान मोदींनी लक्ष्मीकांत दीक्षित यांच्या चरणांना स्पर्श करून आशीर्वाद घेतला.

### अमर महल ते वडाळा जलबोगद्याचा ब्रेक थ्रू...

या बोगद्याद्वारे 'एफ उत्तर' विभागातील माटुंगा, वडाळा परिसर, 'एफ दक्षिण'मधील परळ, 'ई' विभागातील भायखळा आणि 'एल' विभागातील कुर्ला भागांमध्ये पुरेसा व उच्च दाबाने पाणीपुरवठा करणे पालिकेला शक्य होणार आहे. त्यामुळे जलबोगदा प्रकल्पाचा महत्त्वाचा टप्पा या निमित्ताने पार पडला आहे.जलबोगद्याचे खोदकाम पूर्ण झाल्यामुळे पालिकेच्या यादीत आणखी एक महत्त्वाच्या प्रकल्पाची भर पडली आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरानंतर १०० किलोमीटर जलबोगदे असणारे मुंबई महानगर जगातील दुसरे शहर ठरले आहे. हे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी कोविडच्या कालावधीतही प्रकल्पाचे खोदकाम अविरतपणे सुरू होते.

### महाराष्ट्रात पेशवाई आणण्याचा प्रयत्न कदापी...

आरक्षण प्रश्नी भारतीय जनता पक्ष मराठा व ओबीसी समाजाची फसवणूक करत आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे ५० टक्केच्या वर आरक्षण टिकत नाही असे सांगत आहेत तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र ५० टक्क्याच्या वर आरक्षण देता येते असे म्हणत आहेत. भाजपाच्या दोन नेत्यांमध्ये आरक्षणप्रश्नी दोन मते आहेत. आरक्षण प्रश्नी नेमकी भूमिका काय हे त्यांनी स्पष्ट करावे. ५० टक्क्यांच्या वरचे आरक्षण कोर्टात टिकणार नाही हे पाटणा उच्च न्यायालयाच्या निर्णयाने स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आरक्षणावरून भाजपाचा खरा चेहरा उघडा पडला आहे हे बावनकुळे व फडणवीस यांच्या भूमिकेतील तफावत पाहता स्पष्ट होते.

देशात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सर्वे करून जात निहाय जनगणना करणे व ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा हटवणे हाच आरक्षणावरचा पर्याय आहे आणि काँग्रेस पक्षाची ही भूमिका राहुल गांधी यांनी स्पष्ट केलेली आहे. केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार आहे त्यांनी जातनिहाय जनगणना सुरु करावी म्हणजे मराठा, ओबीसी धनगर, आदिवासी, हलबा सह देशातील इतर जातींच्या आरक्षणाच्या प्रश्नांना न्याय देता येईल, असेही नाना पटोले म्हणाले.

### एकदाची जातनिहाय जनगणना करुन टाका...

हे सरकार आंदोलन पेटवत आहे, मराठयांनी ओबीसी विरोधात आणि ओबीसींना मराठ्याविरोधात आंदोलन केले पाहिजे असे सरकारलाच वाटते, असा आरोप अंबादास दानवे यांनी केला.

फुले, शाहू, आंबेडकर विचारांच्या महाराष्ट्रमध्ये असा जातीयवाद होणे महाराष्ट्राला अधोगतीकडे नेणारे आहे. जे कोणी राजकीय नेते आहेत, त्यांनी भूमिका घेताना राजकीय विद्वेष होऊ नये, याची भूमिका घेणे महत्वाचे आहे. ज्या पद्धतीने गोपीनाथ मुंडे ज्या पद्धतीने भूमिका घ्यायचे तशी भूमिका पंकजा मुंडे घेतात का हा माझ्यापुढे प्रश्न आहे. आणि त्याचे परिणाम त्यांना लोकसभा निवडणुकीत चांगले भोगायला भेटले आहेत, असेही अंबादास दानवे यांनी म्हटले.

### राहुल नार्वेकर यांना सत्र न्यायालयाचा दणका...

त्याविरोधात भाजपने आंदोलन केलं होतं. त्यावेळी भाजपने बेस्टच्या महाव्यवस्थापकांना घेराव घातला होता. यावेळी राहुल नार्वेकर, आमदार मंगलप्रभात लोढा, अतुल शाह यांच्यासह भाजपच्या २० पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला होता. गेल्या तीन वर्षांपासून हा खटला सुरु आहे. मात्र या खटल्याच्या सुनावणीसाठी राहुल नार्वेकर न आल्यामुळे त्यांच्यावर आता कोर्टाने ३ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

दरम्यान, राहुल नार्वेकर आणि मविआ यांच्यातील 'नातं' महाराष्ट्रासह संपूर्ण देशाने पाहिलं आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्षांना ट्रिब्युनल म्हणून काम पाहावं लागलं. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर राहुल नार्वेकर यांनी आमदार अपात्रताप्रकरणात सुनावणी घेऊन निर्णय दिला होता.

लोकसभा निवडणुकीत उमेदवारीची चर्चा

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत राहुल नार्वेकर यांना दक्षिण मुंबई मतदारसंघातून उमेदवारी मिळेल अशी शक्यता होती. राहुल नार्वेकर यांचं नाव त्यावेळी चर्चेत होतं. मात्र महायुतीमध्ये ही जागा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे होती. त्यांच्याकडून यामिनी जाधव यांना उमेदवारी देण्यात आली. यामिनी जाधव विरुद्ध ठाकरे गटाचे उमदेवार अरविंद सावंत यांच्यात लढत झाली. यावेळी अरविंद सावंत यांनी यामिनी जाधव यांचा पराभव केला.

### राज्य सरकारच्या आश्वासनानंतर लक्ष्मण...

अधिवेशन काळात सर्वपक्षीय बैठक होणार असून त्यामध्ये चर्चा होऊन निर्णय घेण्यात येईल. या सरकारने आश्वासन दिलं आहे, पण केवळ त्यावर आम्ही विश्वास ठेवणार नाही. त्यामुळे आमच्या मागण्या पूर्णपणे मान्य होईपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार आहे. आता ते फक्त तात्पुरतं स्थगित केलं आहे.

त्यांची दादागिरी चालणार नाही, भुजबळांचा हल्लाबोल

राज्याचे मंत्री छगन भुजबळ बोलताना म्हणाले की, आमच्यावरचा अन्याय कधी संपणार? आता त्यांची दादागिरी चालणार नाही. आरक्षण हा गरिबी हटावचा कार्यक्रम नाही, अन्याय झालेले समाज हळूहळू पुढे यावेत यासाठी आरक्षण आहे.

काय म्हणाले छगन भुजबळ?

लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांना पाडलं. पण लढाई आता संपली नाही. आम्ही कुणालाही घाबरत नाही. यापुढे तुम्ही सगळे एकत्र राहिला तर तुमचं आरक्षण टिकेल. हातावर हात ठेवून बसलात तर काही होणार नाही. यापुढे लोकशक्ती एकत्र आली तर धनशक्तीचा पराभव होणार. विधानसभा आणि लोकसभेत आरक्षण हवं. जातनिहाय जनगणनेला देवेंद्र फडणवीसांचा पाठिंबा आहे.

काही जण ओबीसी प्रवर्गातून आणि १० टक्क्यातूनही आरक्षण घेतात. खोटे कुणबी दाखले देणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणार. ओबीसींना प्रमाणपत्र हवं असेल तर १० महिने थांबावं लागलं.

आपल्याला लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांच्या पाठीशी उभं राहिचे आहे. दलित आदिवासी समाज तुमच्यासोबत आहे. राज्यात अनेक ठिकाणी खोटे दाखले वाटले. ज्यांनी खोटे दाखले वाटले, त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी. खोटे दाखले पुन्हा एकदा तपासले जाणार. खोटे दाखले देणाऱ्यांवर गुन्हा दाखल होणार. पूर्वीचे जे नियम आहेत, ते सुप्रीम कोर्टाच्या नियमांनुसार आहेत.

लक्ष्मण हाके यांच्या मागण्या काय आहेत?

१) ओबीसी भटक्या विमुक्त जाती जमातीच्या मूळ आरक्षणात मराठा समाजाचा समावेश करू नये. तसे लेखी आश्वासन मुख्यमंत्री महोदयाकडून मिळाले पाहिजे.
२) कुणबीच्या लाखो बोगस नोंदीची त्वरित दखल घेवून त्या रद्द करण्यात याव्यात.
३) ओबीसीच्या आर्थिक विकास महामंडळाना आर्थिक तरतूद व्हावी.
४) ओबीसीच्या वसतिगृहाची प्रत्येक जिल्हात योजना कार्यान्वित व्हावी.
५) ओबीसीची जातनिहाय जनगणना व्हावी.

# कोकण विभागात आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज

नैसर्गिक आपत्ती मानवी घटनेविना घडणाऱ्या अशा घटना आहेत. ज्यांचा सर्व सजीवांवर नकारात्मक परिणाम होतो. नैसर्गिक आपत्तीची अनेक कारणे आहेत. निसर्गाच्या विरुध्द दिशेने वाटचाल केल्याने नैसर्गिक आपत्ती उद्भवते, जेव्हा ही कृती टोकापर्यंत पोहचते तेव्हा या घटनांना आपत्ती मानले जाते. हवामानासंबंधी नैसर्गिक आपत्तींमध्ये उष्णकटिबंधीय चक्रीवादळ, पूर, दुष्काळ, वन्य अग्नी, चक्रीवादळ, उष्णतेच्या लाटा आणि शीतलहरी यांचा समावेश आहे, नैसर्गिक आपत्ती या अनिश्चित असतात. नैसर्गिकआपत्ती ही एक अतिशय भयंकर आणि धोकादायक घटना आहे. जी अचानक घडते घरे, मालमत्ता, वस्तू आणि इतर अनेक प्रकारचे नुकसान करुन जनजीवन विस्कळीत करते. मानवी चुकांमुळे, त्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. कारण मानवाकडून पर्यावरणीय संसाधनांचा गैरवापर होतो आहे. यात कुणाचेही दुमत नाही.

कोकणाला लाभलेला समुद्रकिनारा आणि डोंगररांगांमुळे कोकणात सर्वाधिक पावसाची नोंद होते. त्यामुळे कोकणाला मोठया प्रमाणात नैसर्गिक आपत्तीचा सामना ही करावा लागतो. कोकण विभागात एकूण ७ जिल्हे असून ५० तालुके आणि ६ हजार ३५३ गावे आहेत. महाराष्ट्र राज्यातील सर्वाधिक म्हणजे सरासरी २ हजार ते ३ हजार ३६८ मि.मी. पाऊस हा कोकणात पडतो. विशेषत: मुंबई व ठाणे जिल्ह्यात कमी कालावधीत जास्त पाऊस आणि भरतीची वेळ एकच असल्यास पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. कोकण विभागात गेल्या सहा वर्षात सरासरी २ हजार ७०१.४० मि. मी. इतक्या पावसाची नोंद झाली आहे. विभागात एकूण ३७१ पूरप्रवण व २२३ दरडग्रस्त गावे आहेत.

नैसर्गिक आपत्तीच्या घटनांचासामना कधीही नकळत करावा लागत असतो. यासाठी आपत्ती व्यवस्थापन आणि जनजागृती हे महत्त्वाचे उपाय आहेत. मानवनिर्मित आपत्ती ही मानवी चुका, निष्काळजीपणा आणि जाणूनबुजून केलेल्या चुकांमुळे उद्भवणारी आपत्ती आहे. मानवनिर्मित आपत्ती मानवी निष्काळजीपणामुळे उद्भवत असल्या तरी त्या चांगल्या नियोजन आणि प्रतिबंधात्मक पद्धतींनी टाळताही येतात. यंदाच्या नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी पूर्वतयारी केली आहे. एनडीआरएफ कंपन्या राज्यात प्रत्येक ठिकाणी आपत्तीमध्ये वेळेत पोहचू शकत नाहीत, यासाठी राज्यात सातही विभागांच्या ठिकाणी "राज्य आपत्ती प्रतिसाद दले" नेमण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. ठाणे येथे महानगरपालिकेने आपत्ती प्रतिसादासाठी वेळेत धाऊन जाणारे दल तयार केले असून, त्यांनी विशेषत: इमारत दुर्घटनांमध्ये उत्तम काम केलेले आहे. ज्या ठिकाणी उंच इमारती आहेत तसेच आपत्तींची शक्यता जास्त आहे अशा ठिकाणी नगरपालिकांना आपली बचाव दले तयार करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये भूमिगत वाहिन्या, धूप प्रतिबंधक बंधारे, बांध घालणे, बहुउद्देशीय चक्रीवादळामधले आसरे बांधणे, दरडी प्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाय, वीज अटकाव यंत्रणा यांचा समावेश आहे.

एकवेळ मालमत्तेचे नुकसान भरून काढता येते, पण जीवितहानी झाल्याने झालेले नुकसान कितीही मदत निधी देऊन भरुन काढता येत नाही. या पावसाळयात आपत्तीमुळे जिवीतहानी होऊ नये यासाठी प्रशासनासोबत जनतेनेही दक्ष राहणे गरजेचे आहे. शोध मोहिम-बचाव आणि सुटकेसाठी प्रशासनामार्फत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची तयारी करण्यात आली आहे. आपत्तीच्या काळात सर्व अधिकाऱ्यांनी चोवीस तास फोन सुरु ठेवावेत. आपत्तीवर मात करण्यासाठी जिल्हा-विभाग ते राज्यस्तरीय सर्व यंत्रणांतील अधिकाऱ्यांनी उत्तम संपर्क आणि समन्वय राखावा, असे निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

आपत्ती प्रवण भागाचे आधुनिक तंत्रज्ञानाने डिजीटल मॅपींग, प्रतिसाद, शोध-बचाव आणि सुटका यासाठी आधुनिक तंत्रज्ञान उपकरणांची मदत, यापूर्वी झालेल्या भूस्खलन भागातील नागरिकांशी संवाद, पुन्हा काही लोक त्या भागात रहिवासासाठी गेले असतील, तर त्यांची माहिती घेणे कारण भूस्खलन, दरडी आणि जमीनीच्या अनुषंगाने होणाऱ्या हालचाली या भागातील नागरिकांना चांगल्याप्रकारे माहित असतात. त्याबाबत त्यांच्याशी संवाद साधून त्यांचे स्थलांतर आणि पुनर्वसनाबाबत तयारी करण्याचे आदेश प्रशासनाकडून संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. बहुउद्देशीय सभागृहे, शाळा किंवा तत्सम निवारे उपलब्धता याबाबत पूर्वतयारी करण्यात आली आहे. अशा ठिकाणी आवश्यक अन्न-धान्य तसेच औषधोपचारासाठा याबाबत संबंधित विभागांना सुचना देण्यात आल्या आहेत. पुरामुळे संपर्क तुटणाऱ्या गावात आतापासूनच औषधांचा पुरेसा पुरवठा करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र याठिकाणी तयारी ठेवण्यात आली आहे. वीज पुरवठा सुरळीत राहील यासाठी महावितरणाच्या अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. एनडीआरएफ, एसडीआरफशी संपर्क-समन्वय राखणे, हवामान खात्याकडून दिल्या जाणाऱ्या इशाऱ्यांबाबत सतर्क राहणे, जीवरक्षकांची आवश्यकता भासल्यास त्यांची मानधन तत्वावर नेमणूक करणे यासर्व गोष्टींसाठी संबंधित यंत्रणांना आदेश देण्यात आले आहेत. नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रशासनाकडून युध्दपातळीवर पूर्वतयारी करण्यात येत आहे. परंतू संकटकालीन परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी लोकसहभागही तितकाच महत्वाचा आहे. विभागस्तरावरील आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला सर्तक राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच पावसाळयात निर्माण होणाऱ्या संभाव्य नैसर्गिक आपत्तीमध्ये सुरक्षा व्यवस्था कशी ठेवण्यात यावी त्यादृष्टीने जिल्हास्तरापासून ग्रामपातळीपर्यंत आराखड्यानुसार उपाययोजना करण्यात येत आहेत. निर्माण होणारी संभाव्य परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. याशिवाय पूरपरिस्थितीमुळे साथ रोगांना नियंत्रित ठेवण्यासाठी आरोग्य यंत्रणा, विद्युत पुरवठा सुरळित ठेवण्यासाठी महावितरण कंपनी, दुरध्वनी सेवा सुस्थितीत ठेवण्यासाठी दुरसंचार विभाग, रस्त्यांने वाहतूकीचा संपर्क असावा यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य परिवहन महामंडळ, पाटबंधारे विभाग व इतर संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. आपतकालीन परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणेसोबतच शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी, होमगार्डस, पोलीस प्रशासन, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आदीचा प्रामुख्याने सहभाग असतो. तसेच आपतकालीन परिस्थितीमध्ये ग्रामस्थांनी देखील हिरीरीने पुढाकार घेऊन सुरक्षा व्यवस्थेला सहकार्य करण्याची गरज आहे.

कोकण विभागात आपत्ती झाल्यास कृपया पुढील क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

विभागीय आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष

कोंकण भवन, नवी मुंबई -०२२-२७५७१५१६, उमेश शिर्के ,डीडीएमसी – ७५८८०९२३२०.

मुंबई शहर - ०२२-२२६६४२३२, विशाल बडे, डीडीएमओ -९६६५३०४१२४.

मुंबई उपनगर - ०२२-६९४०३३४४, दीपक शिंदे, डीडीएमओ -८१०४७२९०७७.

ठाणे - ०२२-२५३०१७४०, अनिता जवंजाळ, डीडीएमओ -७३०४६१३१०५.

पालघर -०२५२५-२९९३५३, विवेकानंद कदम, डीडीएमओ - ९३२२९३८९३७.

रायगड - ०२१४१-२२२११८, सागर पाठक, डीडीएमओ - ९७६३६४६३२६.

रत्नागिरी - ०२३५२-२२६२४८, अजय सूर्यवंशी, डीडीएमओ - ९४२०२४४९३७

सिंधुदुर्ग - ०२३६२-२२८८४७, राजेश्री सामंत, डीडीएमओ - ९८३४३८५७९२.

**प्रविण डोंगरदिवे**
**उपसंपादक**
**विभागीय माहिती कार्यालय**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www. lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## माळशेज घाटात भिषण अपघात, दुचाकीस्वार तरुण तरुणीचा जागीच मृत्यू



● मुरबाड - मुरबाड -कल्याण राष्ट्रीय महामार्ग असलेल्या माळशेज घाटात भिषण अपघातात दुचाकीस्वार तरुण तरूणीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी दुपारी बारा वाजण्याच्या दरम्यान घडली आहे.

मुंबई येथील सांताक्रुझ मध्ये राहाणारे, रोहित डिंगणकर व नंदिनी मयांगडे हे माळशेज घाटात फिरण्यासाठी आले होते. दुपारनंतर मुंबईच्या दिशेने जात असताना माळशेज महामार्गावर नाणे घाट महामार्गावरील ६१ मध्ये तारकपुर बसला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या दोन्ही तरुण तरुणीचा जागीच मृत्यू झाला आहे. तसेच अपघाता संदर्भात टोकवाडे पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

अपघाताची तीव्रता इतकी होती की मृत तरुणांच्या डोक्यामध्ये हेल्मेट अडकुन राहीले होते तसेच बसच्या पुढील भाग निखळून पडला असुन दुचाकीचा चक्काचूर झाला आहे संबंधित मृत तरुण तरुणीचा मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी टोकावडे पोलीसांनी मुरबाड शहरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले . तर बस चालक संजय पवार व वाहक ऊषा मुंडलीक यांना चौकशीसाठी टोकावडे पोलीस ठाण्यात हजर केले असुन टोकावडे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# पिसवली येथे सापडलेल्या निवडणूक ओळखपत्रांची चौकशी करण्याची शिवसेना ठाकरे गटाची मागणी

■ शिवसेना उद्धव बाळसाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मानपाडा पोलिसांना दिले निवेदन

■ तर ही निवडणूक रद्द करावी व पुन्हा निवडणूक घेण्याची वैशाली दरेकर यांची मागणी

● कल्याण : कल्याण शीळ रोडवरील पिसवली येथे सापडलेल्या निवडणूक ओळखपत्रांची चौकशी करण्याची मागणी शिवसेना ठाकरे गटाने केली असून शिवसेना उद्धव बाळसाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मानपाडा पोलिसांना निवेदन देण्यात आलं. तर झालेली लोकसभा निवडणूक रद्द करावी व पुन्हा निवडणूक घेण्याची मागणी माहाविकास आघाडीच्या पराभूत उमेदवार वैशाली दरेकर यांनी केली आहे. यावेळी शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख सदानंद थरवळ, धनंजय बोडारे, महिला जिल्हा संघटिका वैशाली दरेकर राणे, माजी नगरसेवक पुरुषोत्तम चव्हाण, कल्याण पूर्व शहर प्रमुख शरद पाटील, डोंबिवली पूर्व शहर प्रमुख अभिजीत सावंत, हेमंत चौधरी आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.



दोन दिवसांपूर्वी मध्यरात्रीची पिसवली गेट जवळ मोठ्या प्रमाणात मतदार ओळखपत्र रस्त्यावर सापडली होती. अनोळखी व्यक्ती एक गोणी भरून मतदान ओळखपत्र टाकून पसार झाला होतं तर दुसऱ्या अनोळखी व्यक्तीने मतदान ओळखपत्र त्या ठिकाणाहून गायब केल्याचा प्रकार घडला होता. मोठ्या प्रमाणात मतदान ओळखपत्र भर रस्त्यात आणून टाकल्यामुळे परिसरामध्ये गोंधळ उडाला होता. या प्रकाराची गंभीर दखल घेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज मानपाडा पोलिसांना निवेदन देण्यात आले.

दोन दिवसांपूर्वी पिसवली गावाच्या प्रवेशद्वारापाशी निवडणूक ओळखपत्रे सापडली आहेत ओळखपत्रे खरी आहेत की बनावट याबाबत चौकशी व्हावी. या ओळखपत्रातील व्यक्ती ह्या त्या परिसरात किंवा आजूबाजूच्या परिसरातील आहेत का याची चौकशी व्हावी. ओळखपत्रातील व्यक्तींनी मतदान केले आहे का? या बाबत विचारणा व्हावी, केले असल्यास कोणते ओळखपत्र त्यांनी वापरले? आताच झालेल्या लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर या ओळखपत्रांखेरीज अजूनही ओळखपत्रे या कल्याण लोकसभेमध्ये असू शकतात, तरी या सापडलेल्या ओळखपत्रांबाबत सखोल तसेच प्रामाणीकपणे चौकशी व्हावी व संबंधीतावर कडक कारवाई करावी अशी मागणी यावेळी निवेदनाद्वारे करण्यात आली.

तर आता साडे सातशे, ते एक हजार वोटर आयडी सापडले आहेत. आणखी किती वोटर आयडी बनवले असतील हा संशोधनाचा विषय असून २०२४ ची झालेली हि कल्याण लोकसभा निवडणूक संशयाच्या फेऱ्यात असून या प्रकरणाची सखोल चौकशी करत ठोस कारवाई करावी. अशाप्रकारे खोटे ओळखपत्र बनवले गेले असेल तर ही निवडणूक रद्द करावी व पुन्हा निवडणूक घेण्याची मागणी ठाकरे गटाच्या महिला जिल्हा संघटिका तथा महाविकास आघाडीच्या पराभूत उमेदवार वैशाली दरेकर राणे यांनी केली आहे.

## वडाचे वृक्षारोपण करून दिला पर्यावरणशील संदेश



● नवी मुंबई - वटपौर्णिमेचा सण आपल्या सौभाग्याला उदंड आयुष्य लाभावे म्हणून अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. यानिमित्त वडाची पूजा करून निसर्गाशी जवळीक साधली जाते. मात्र आजच्या इन्स्टन्ट आधुनिक युगात घरातल्या घरात वटपूजा करण्यासाठी वडाच्या फांद्यांची काही प्रमाणात तोड होताना दिसते.

अशाप्रकारे होणारी वृक्षहानी टाळावी आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश प्रसारित व्हावा याकरिता वटपौर्णिमेच्या सणाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील महिला कर्मचारी यांनी वृक्षारोपण करून "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश प्रसारित करण्याचे ठरविले आणि १८ वडांचे वृक्षारोपण केले. नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालय इमारतीच्या आवारात महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर आणि उदयान विभागाच्या सहा आयुक्त श्रीम. ऋतुजा गवळी यांच्या प्रमुख उपस्थितीत ५० हून अधिक महिला कर्मचा-यांनी अत्यंत उत्साहाने वृक्षारोपण केले.

## राजाराम पाटील नगरमध्ये कीटकनाशक फवारणी



● कल्याण : गुरुवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे कल्याण पूर्वेतील आडीवली येथील राजाराम पाटील नगर येथे रस्त्यावर आणि सखल भागात नागरिकांच्या घरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. पावसाच्या साचलेल्या पाण्यामुळे परिसरात रोगराई पसरण्याची भीती नगरिकांनी व्यक्त केली.

राजाराम पाटील नगर काका ढाबा अडवली संपूर्ण परिसर मध्ये माशा व मच्छर किटाणू यांच्यामुळे रोगराई पसरत असल्यामुळे आज पूर्ण परिसरामध्ये आई एकविरा महिला मंडळ संस्थापक अध्यक्ष सोनी क्षीरसागर तसेच समाजसेवक संदीप क्षीरसागर यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत फोनवर संवाद साधून वेळेवर संपूर्ण परिसरामध्ये धुराची कीटकनाशकाची मशीन मागवून फवारणी करण्यात आली.

## बेकायदेशीररीत्या बांधून ठेवलेले देशी-विदेशी जातीचे १२ श्वान जप्त

ठाणे : कोपरी येथील हरिओम नगर भागात एका पत्र्याच्या शेडमध्ये अस्वच्छ जागेत १० विदेशी आणि दोन देशी श्वान बेकायदेशीररित्या बांधून ठेवण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. त्यांना पुरेसे खाद्य पदार्थ दिले जात नव्हते. प्राणी प्रेमी संघटनांच्या मध्यस्थीनंतर या श्वानांची सुटका करण्यात आली आहे. यातील तीन श्वानांवर प्राथमिक उपचार सुरू असून उर्वरित श्वानांची प्रकृती स्थिर आहे. या श्वानांना बांधून ठेवणारा व्यक्ती कंपन्यांना त्यांच्या सुरक्षेसाठी श्वान पुरविण्याचा व्यवसाय करतो. त्याच्याकडे एक घोडा देखील आढळून आला आहे. त्याच्याकडे श्वानांची कोणतीही नोंदणी आढळून आली नसल्याची माहिती प्राणी प्रेमी संघटनेने दिली.

हरिओम नगर येथील स्मशानभूमीच्या मागील बाजूस काही श्वान बेकायदेशीररित्या बांधून ठेवण्यात आल्याची माहिती सिटिझन्स फॉर ॲनिमल प्रोटेक्शन (कॅप) या संस्थेला मिळाली होती. सुमारे आठवड्याभरापूर्वी कॅप संस्थेच्या सदस्यांनी या ठिकाणी पाहाणी केली. त्यावेळी तिथे विदेशी आणि देशी जातीच्या श्वानांना बांधून ठेवल्याचे आढळून आले. त्यानंतर दोन दिवसांपूर्वी एक चित्रीकरण प्रसारित झाले होते. त्यामध्ये श्वानांना आहार दिला जात नव्हता. तसेच तिथे अस्वच्छता असल्याचे प्राणी प्रेमी संघटनांना आढळून आले. त्यांनी महापालिकेकडे तक्रार केली. परंतु कोणतीही कारवाई झाली नाही. अखेर शुक्रवारी दुपारी कॅप, पेटा आणि कलोटे ॲनमल ट्रस्ट या प्राणी मित्र संस्थेचे सदस्य त्याठिकाणी गेले. त्यांनी श्वानांना सोडण्याची विनंती केली.



## इमारतीवरील पत्रा पडून ४ ते ५ मुले जखमी

● ठाणे : शुक्रवारी रात्री ठाणे शहरात सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडल्याने काही ठिकाणी पडझड झाली. या पावसात ठिकठिकाणी वृक्ष उन्मळून पडले. गावंड बाग भागात फूटबॉल टर्फवर वाऱ्यामुळे उडून आलेला लोखंडी पत्रा कोसळून तिथे खेळत असलेल्या पैकी चार ते पाच मुले जखमी झाल्याची घटना घडली आहे. मात्र त्यांचे वय समजू शकलेले नाही.

ठाणे शहरात शुक्रवारी रात्री सोसाट्याचा वारा, विजांच्या कडकडाटासह पाऊस पडला. या पावसाने ठाणे शहरात ठिकठिकाणी वृक्ष उन्मळून पडले. लुईसवाडी परिसरात रस्त्याकडेला उभ्या असलेल्या वाहनांवर वृक्ष पडल्याने वाहनांचे नुकसान झाले. अनेक भागात रात्री विद्युत पुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे नागरिकांचे हाल झाले. शहरातील अंतर्गत आणि मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती.

गावंडबाग भागात फुटबॉल खेळाचे टर्फ आहे. येथील टर्फवर वाऱ्यामुळे उडून आलेला लोखंडी पत्रा कोसळला. यात तिथे फुटबॉल खेळणारी चार ते पाच मुले जखमी झाल्याची प्राथमिक माहिती प्रत्यक्षदर्शिनी दिली. या मुलांना स्थानिक नागरिकांनी उपचारासाठी नजिकच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. हा पत्रा नेमका कुठून या फुटबॉल टर्फवर आला याबाबत काहीच माहिती समजू शकली नाही.

## ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या आराखड्यास मान्यता

● ठाणे : बहुचर्चित ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या पूनर्निर्माण आराखड्यास आणि अंदाजपत्रकास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. ५६० कोटी रुपयांचे हे अंदाजपत्रक असून सार्वजिनक बांधकाम विभागाच्या माध्यमातून हे रुग्णालय बांधण्यात येणार आहे. रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर येथे ३ हजार २७८ खाटांची व्यवस्था होणार आहे. तसेच मनोरुग्णाचे नातेवाईकांना वसतिगृह, रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसाठी निवासी व्यवस्था अशा विविध २८ ते ३० इमारती बांधल्या जाणार आहेत. सध्या या रुग्णालयाचे बांधकाम जीर्ण झाले आहे. सुमारे १२५ वर्षे जुने रुग्णालय असून सध्या या रुग्णालया १ हजार ८५० खाटांची व्यवस्था आहे.




ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालय १९०१ मध्ये हे रुग्णालय सुरू झाले होते. मुंबई, ठाणे, नाशिक आणि रायगड जिल्ह्यातील विविध भागातून मनोरुग्णांना घेऊन त्यांचे नातेवाईक ठाणे प्रादेशिक मनोरुणालयात येत असतात. तसेच परराज्यातून अनेक रुग्ण रेल्वेगाडी किंवा इतर मार्गाने वाट चूकून येतात. हे रुग्ण रेल्वे स्थानक परिसरात आढळून आल्यानंतर त्यांना देखील रुग्णालयात आणले जाते. त्यामुळे राज्यातील इतर तीन प्रादेशिक मनोरुग्णालयापेक्षा ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयात उपचारासाठी दाखल रुग्णांचे प्रमाणही खूप असते. सुमारे ५० एकरमध्ये पसरलेल्या या रुग्णालयाच्या काही भागात अतिक्रमण झाले आहे. रुग्णालयाच्या इमारती धोकादायक आणि जीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे रुग्ण, डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. या रुग्णालयाच्या जागेत नवे ठाणे रेल्वे स्थानक उभारले जाणार आहे. तसेच २८ ते ३० एकर जागेत मनोरुग्णालयाचे पूनर्निर्माण करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता.

नुकताच राज्य शासनाने रुग्णालयाच्या आराखड्यास आणि ५६० कोटी पाच लाख ४९ हजार रुपये इतक्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या रुग्णालयाचे बांधकाम केले जाणार आहे. त्यामुळे येथे ३ हजार २७८ खाटांची व्यवस्था होणार आहे.

### कसे असेल रुग्णालय

मुख्य दुमजली इमारत असून यात ३ हजार ४०० चौ.मीटर इतके बाह्य रुग्ण कक्ष असेल. तसेच महिला आणि पुरुष रुग्णांसाठी वेगवेगळे सामान्य कक्ष, निरीक्षण कक्ष, रुग्णांच्या नातेवाईकांना तीन मजली वसतिगृह, तृतिय आणि चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांसाठी निवासी इमारत, वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी निवासस्थान अशा विविध सुविधा इमारती रुग्णालयाच्या आवारात असतील.

## डोंबिवली रेल्वे स्थानकातील स्थलांतरित आरक्षित तिकिटांचे केंद्र सज्ज

● डोंबिवली - डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एक ते पाचच्या दरम्यान उभारण्यात येणाऱ्या पादचारी पुलाच्या कामासाठी या पुलाने बाधित होत असलेले फलाट क्रमांक एकवरील जुने प्रवासी आरक्षित तिकिटांचे केंद्र फलाटाच्या कल्याण बाजुकडे स्थलांतरित करण्यात आले आहे. हे केंद्र उभारणीचे काम मागील दोन महिन्यांपासून सुरू होते. हे केंद्र आता प्रवासी सेवेसाठी सज्ज करण्याचे काम अंतीम टप्प्यात आले आहे.



डोंबिवली रेल्वे स्थानकातील प्रवाशांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. या गर्दीमुळे सरकते जिने, पायी जाण्याचे जिने प्रवाशांना अपुरे पडत आहेत. या जिन्यांवरील गर्दी पुन्हा पादचारी पुलावर येते. त्यावेळी प्रवाशांना चालणे मुश्किल होते. प्रवाशांची ही अडचण विचारात घेऊन मध्य रेल्वे प्रशासनाने डोंबिवली रेल्वे स्थानकात पंडित दिन दयाळ चौक ते डोंबिवली पूर्व भागातील रामनगर दरम्यान फलाट क्रमांक एक ते पाचच्या दरम्यान एक पादचारी पूल उभारणीचे काम गेल्या सहा महिन्यांपासून सुरू केले आहे.

या पुलाच्या उभारणीत दिनदयाळ चौक भागातील जुने रेल्वे आरक्षण केंद्र बाधित होते. त्यामुळे पुलाचे काम सुरू झाल्यानंतर आरक्षित तिकिटे घेणाऱ्या प्रवाशांची गैरसोय नको म्हणून रेल्वे प्रशासनाने फलाट क्रमांक एकवरच कल्याण बाजुने तात्पुरत्या स्वरुपात आरक्षण केंद्र उभारणीचे काम गेल्या दोन महिन्यापासून सुरू केले आहे. हे काम आता अंतीम टप्प्यात आले आहे. लवकरच हे आरक्षण केंद्र सुरू करण्यात येईल, असे रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले.

नवीन जागेत आरक्षण केंद्र सुरू झाले की जुने आरक्षण केंद्र रेल्वे ठेकेदाराकडून पाडण्याचे काम सुरू केले जाणार आहे. नवीन जागेत आरक्षण केंद्र सुरू झाल्याने डोंबिवली पश्चिमेतून महात्मा फुले रस्त्याने येणाऱ्या प्रवाशांना रेल्वे स्थानकात आता मुख्य प्रवेशव्दारातून यावे लागणार आहे. रिक्षा चालकांनाही या भागात रिक्षा उभी करून प्रवासी मिळणे शक्य होणार नसल्याने हा रस्ता आता वाहतुकीसाठी मुक्त राहणार आहे.

## आयुक्तांनी शहरातील मार्केट वापरात आणण्यासाठी केली पाहणी

● नवी मुंबई : महानगरपालिकेच्या बांधून तयार झालेल्या वास्तू विहित प्रयोजनासाठी वापरात याव्यात असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विभागांच्या आढावा बैठकीत दिले होते. त्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रातील मार्केटच्या इमारती वापरात येण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांसह मार्केट इमारतींची प्रत्यक्ष पाहणी करुन त्या वापरात येण्याच्या दृष्टीने सूचना केल्या. सूचना केलेल्या बाबींची तातडीने अंमलबजावणी करुन ही मार्केट तत्परतेने सुरु करावीत असे निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.




दिवाळेगाव येथील मार्केटची पाहणी करताना आयुक्तांनी तेथील अंतर्गत व परिसर स्वच्छतेवर अधिक भर देण्याच्या सूचना केल्या. त्या ठिकाणी सदयस्थितीत पोर्टेबल स्वरुपाची शौचालये ठेवलेली असून तेथे कायमस्वरुपी शौचालय बांधावे असे निर्देश आयुक्तांनी दिले. सानपाडा सेक्टर ४ येथील दैनंदिन बाजार इमारतीची पाहणी करताना विक्रेत्यांना व ग्राहकांना सोयीचे व्हावे यादृष्टीने तेथील ओटल्यांची रचना काहीशी बदलून ती टेबल स्वरुपाची करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. हे काम तत्परतेने करून मार्केट त्वरित वापरात आणण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सानपाडा सेक्टर १४ येथील मार्केटमध्येही बाहेरच्या बाजूस वेदरशेड करण्याच्या सूचना करुन त्याठिकाणी असलेल्या दुसऱ्या प्रवेशव्दारावरुन नागरिकांना सुलभतेने ये-जा करण्यासाठी तेथे पायऱ्यांची व्यवस्था करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. वाशी सेक्टर १ येथील मार्केटमधील ओटल्यांची रचना बदलण्याचे सूचित करुन आयुक्तांनी त्याठिकाणचेही छत बाहेरच्या बाजूस वाढवून वेदरशेड टाकण्याच्या सूचना केली.

# वेस्ट इंडिजनं अमेरिकेला लोळवलं

## अवघ्या १०.५ षटकात जिंकला सामना, शाई होपची वादळी खेळी

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४चा ४६वा सामना बार्बाडोस येथे वेस्ट इंडिज आणि अमेरिका यांच्यात खेळवला गेला. या सामन्यात वेस्ट इंडिज संघानं अमेरिकेचा ९ विकेटनं एकतर्फी पराभव केला. सुपर-८ मधील पहिल्या सामन्यात विंडीज संघाला इंग्लंडविरुद्ध पराभवाला सामोरं जावं लागलं होतं, त्यानंतर उपांत्य फेरीच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी त्यांना या सामन्यात मोठा विजय नोंदवणं आवश्यक होतं. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना अमेरिकेचा संघ १९.५ षटकात १२८ धावांपर्यंतच मर्यादित राहिला. प्रत्युत्तरात शाई होपच्या स्फोटक खेळीच्या जोरावर विंडीज संघानं केवळ 1 विकेट गमावून १०.५ षटकात हे लक्ष्य गाठलं.

अमेरिकेची खराब फलंदाजी : अमेरिकेनं प्रथम फलंदाजी करताना १९.५ षटकात सर्वबाद १२८ धावा केल्या. यादरम्यान अँड्रिज गॉसनं १६ चेंडूत ३ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीनं २९ धावा, नितीश कुमारनं १९ चेंडूत २० धावा केल्या. कर्णधार ॲरॉन जोन्स ११ धावा करुन बाद झाला. अमेरिकेच्या डावात वेस्ट इंडिजकडून रसेलनं ३ विकेट घेतले. त्यानं ३.५ षटकात ३१ धावा दिल्या. अल्झारी जोसेफनं ४ षटकात ३१ धावा देत २ विकेट घेतले. रोस्टन चेसनं ४ षटकात १९ धावा देत ३ विकेट घेतले.

शाई होपची वादळी खेळी : या सामन्यापूर्वी वेस्ट इंडिज संघाला ब्रँडन किंगच्या रुपानं मोठा धक्का बसला. तो अनफिट असल्यामुळं संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडला आहे. त्यामुळं त्याच्या जागी शाई होपला संघात स्थान दिलं. विंडीज संघाचा हा निर्णय पूर्णपणे योग्य ठरला. १२९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना होप आणि जॉन्सन चार्ल्सच्या जोडीनं वेस्ट



इंडिज संघाला शानदार सुरुवात करुन दिली आणि पहिल्या ६ षटकात संघाची धावसंख्या ५८ धावांपर्यंत नेली. यानंतर चार्ल्स १४ चेंडूत १५ धावांची खेळी करुन पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर निकोलस पूरन फलंदाजीसाठी आला. पूरन आणि होप या दोघांनी धावांचा वेग अजिबात कमी होऊ दिला नाही. होपनं मोठे फटके खेळणं सुरूच ठेवलं. त्यानं ३९ चेंडूत ८२ धावांच्या नाबाद खेळीत ८ षटकार आणि ४ चौकार खेचले. होपनं या डावात २१० च्या स्ट्राईक रेटनं धावा केल्या. पूरननं १२ चेंडूत २७ धावांची नाबाद खेळी केली. वेस्ट इंडिजनं गुणतालिकेत पटकावलं दुसरं स्थान : अमेरिकेविरुद्धच्या या सामन्यात केवळ १०.५ षटकात लक्ष्याचा पाठलाग केल्यानं वेस्ट इंडिज संघानं आपल्या निव्वळ रनरेटमध्ये चांगली सुधारणा केली आहे. सुपर-८ मधील गट २ च्या गुणतालिकेत दक्षिण आफ्रिका ४ गुणांसह पहिल्या स्थानावर आहे, तर वेस्ट इंडिज २ सामन्यांमध्ये एक विजय आणि एक पराभवासह दुसऱ्या स्थानावर आहे, ज्यामध्ये त्यांचा निव्वळ रनरेट १.८१४ आहे. इंग्लंड संघानं २ सामने खेळले आहेत. यात एक सामना जिंकला आहे, तर दुसरा सामना गमावला आहे आणि त्यांचा निव्वळ रनरेट ०.४१२ आहे.

दोन्ही संघ

अमेरिकेचा संघ : स्टीव्हन टेलर, अँड्रिज गॉस (विकेटकीपर), नितीश कुमार, ॲरॉन जोन्स (कर्णधार), कोरी अँडरसन, मिलिंद कुमार, हरमीत सिंग, शॅडली व्हॅन शाल्कविक, नॉस्तुश केन्झिगे, अली खान, सौरभ नेत्रावलकर.

वेस्ट इंडिजचा संघ : जॉन्सन चार्ल्स, शाई होप, निकोलस पूरन (विकेटकीपर), रोस्टन चेस, रोव्हमन पॉवेल (कर्णधार), शेरफेन रदरफोर्ड, आंद्रे रसेल, अकेल होसेन, अल्झारी जोसेफ, गुडाकेश मोती, ओबेद मॅकॉय.



## सोनाक्षी सिन्हाच्या हातावर मेहंदी सजली, जहीर इकबालसोबत उद्या रजिस्टर मॅरेज

अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा आज बॉयफ्रेंड जहीर इकबालसोबत लग्नबंधनात अडकणार आहे. कुटुंबीय आणि मोजक्याच मित्रपरिवाराच्या उपस्थितीत सोनाक्षी आणि जहीर रजिस्टर मॅरेज करणार आहेत. दरम्यान सोनाक्षीच्या मुंबईतील घरी इतर विधी पार पडत आहेत. शत्रुघ्न सिन्हा यांचा मुंबईतील 'रामायणा' बंगला विद्युतरोषणाईने सजला आहे. तर सोनाक्षीला जहीरच्या नावाची मेहंदी लागली आहे.


सोनाक्षी सिन्हा काही वर्षांपासून जहीर इकबालला डेट करत होती. अचानक तिने लग्न करण्याचा निर्णय घेतला. उद्या २३ जून रोजी दोघं रजिस्टर मॅरेज करणार आहेत. सोनाक्षीचे कुटुंबीय या लग्नासाठी तयार नसल्याच्या चर्चा होत्या. 'आजकालची मुलं परवानगी घेत नाहीत..' असं शत्रुघ्न सिन्हा यांनी म्हटलं होतं. पण आता सिन्हा कुटुंबात सर्वकाही आलबेल झाल्याचं पाहायला मिळत आहे. 'रामायणा' बंगला आता विद्युत रोषणाईने सजला आहे. तर सोनाक्षीचा परिवारासह फोटो व्हायरल होतोय. काल रात्रीच त्यांचा मेहंदी सोहळा पार पडला. सगळीकडे फुलांची सजावट केली आहे. सोनाक्षी लाल रंगाच्या आऊटफिटमध्ये सुंदर दिसत आहे. तर जहीरने पांढरा प्रिंटेड कुर्ता परिधान केला आहे.

कोण आहे जहीर इकबाल?

सोनाक्षी सिन्हा आणि जहीर इकबालने २०२२ साली 'डबल XL' सिनेमात स्क्रीन शेअर केली होती. तेव्हापासूनच दोघंही एकमेकांना डेट करत आहेत. जहीरचे वडील इकबाल रतनसी हे सलमान खानचे मित्र आहेत. तसंच ते व्यापारी आहेत. जहीरही वडिलांचा बिझनेस सांभाळतो. तसंच तो अभिनय क्षेत्रातही आहे.

# अभिनेते अनुपम खेर यांच्या कार्यालयात चोरी करणाऱ्या दोघांना अटक

प्रसिद्ध अभिनेते अनुपम खेर यांच्या अंधेरीतील कार्यालयात चोरी करणाऱ्या दोघांना अटक करण्यात अंबोली पोलिसांना यश आले आहे. खेर यांनी स्वतः चोरी झाल्याची माहिती समाज माध्यमावरून दिली होती. या चोरांनी कार्यालयात प्रवेश करून रोख चार लाख पंधरा हजार रुपये आणि 'मैने गांधी को क्यू मारा' या फिल्मचे रिल चोरून नेले होते. त्यातील रोख ३४ हजार रुपये व फिल्मची रिल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.



हिंदी चित्रपटसृष्टीतील नामांकित अभिनेते अनुपम खेर यांच्या मालकीचे अंधेरीतील विरा देसाई मार्ग परिसरात एक कार्यालय आहे. दोन दिवसांपूर्वी रात्री काम संपल्यानंतर कर्मचारी कार्यालय बंद करून घरी गेले होते. दुसऱ्या दिवशी एक कर्मचारी कार्यालयात आला होता, यावेळी तेथे चोरी झाल्याचे त्याच्या निदर्शनास आले. अज्ञात चोरांनी कार्यालयात प्रवेश करून रोख रकमेसह फिल्म रील चोरले होते. याबाबतची माहिती कर्मचाऱ्यांनी अनुपम खेर यांना दूरध्वनी करून दिली. कार्यालयातील सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील चित्रण पाहिले असता रात्री उशीरा दोन तरुण कार्यालयात शिरल्याचे निदर्शनास आले. या दोघांनी कपाटाच्या खणातील रोख आणि फिल्म रील घेऊन पलायन केले. याबाबतची माहिती आंबोली पोलिसांना देण्यात आली. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांना सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील चित्रण देऊन दोन्ही आरोपीविरुद्ध तक्रार केली. खेर यांच्यावतीने शांताराम पाटील यांनी ही तक्रार केली.

या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध घरफोडीच्या गुन्ह्यांची नोंद केली. पळून गेलेल्या आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. प्राथमिक तपासात ते दोघेही कार्यालयातून चोरी करून बाहेर आल्यानंतर एका रिक्षातून निघून गेल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी याप्रकरणी रफीक शेख (३५) व मोहम्मद दिलशान खान (२०) या चोरांना अटक केली. त्यांच्याकडून ३४ हजार रूपये व फिल्म रील पोलिसांनी हस्तगत केले. पोलीस निरीक्षक जयदेव शिंदे यांच्यासह हरीभाऊ बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने ही कारवाई केली. पोलिसांनी आरोपींकडून लोखंडी तिजोरीही हस्तगत केली. आरोपींविरोधात यापूर्वीही गुन्हे दाखल आहेत का याची तपासणी पोलीस करीत आहेत. तसेच आरोपींनी चोरलेली रक्कम कोठे ठेवली आहे, याबाबतही पोलीस तपास करीत आहेत.

## दिनविशेष

**घटना**

२०१६: युनायटेड किंगडम - देशाने युरोपियन युनियन सोडण्यासाठी सार्वमतात ५२% ते ४८% मते दिली.
२०१३ : निक वॉलेंडा - दोरीवर यशस्वीरित्या ग्रँड कॅन्यन ओलांडून चालणारे पहिले व्यक्ती बनले.
२०१३ : नांगा पर्वत अतिरेकी हल्ला - गिलगिट-बाल्टिस्तान, पाकिस्तानमधील नांगा परबत जवळील उंच पर्वतारोहण बेस कॅम्पवर अतिरेक्यांनी हल्ला केला, त्यात १० गिर्यारोहक आणि एक स्थानिक मार्गदर्शक यांचे निधन.
१९९८: दुसऱ्या महायुद्धात जपानच्या शरणागतीची साक्षीदार असलेली यू. एस. एस. मिसुरी ही युद्धनौका निवृत्तीनंतर पर्ल हार्बर बंदरात दाखल झाली.
१९९६ : शेखहसीना वाजेद बांगलादेशचे पंतप्रधान.

**जन्म**

१९८०: रामनरेश सरवण - वेस्ट इंडीजचा क्रिकेटपटू
१९७२ : झिनेदिन झिदान - फ्रेंच फुटबॉलपटू
१९४८: नबरुण भट्टाचार्य - भारतीय पत्रकार आणि लेखक (निधन: ३१ जुलै २०१४) १९४२ : जब्बार पटेल दिग्दर्शक
१९३६ : कॉस्टास सिमिटिस ग्रीक पंतप्रधान
१९३५ : राम कोलारकर मराठी लेखक
१९१६ : लेन हटन - इंग्लिश क्रिकेटपटू (निधन: ६ सप्टेंबर १९९०)

**निधन**

२०२० : निलंबर देव शर्मा भारतीय डोंगरी भाषेतील साहित्याबद्दल इंग्रजीतील पहिले प्रकाशन केलेले लेखक पद्मश्री (जन्म: ६ ऑक्टोबर १९३१)
२००६: बुधी कुंदरन - भारतीय क्रिकेटपटू (जन्म: २ ऑक्टोबर १९३९)
२००५: डॉ. है. वि. इनामदार साहित्यिक
१९९६ : रे लिंडबॉल - ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू (जन्म: ३ ऑक्टोबर १९२१)
१९९५: जोनास साल्क - पोलिओची लस शोधणारे अमेरिकन विषाणूशास्त्रज्ञ (जन्म: २८ ऑक्टोबर १९१४)
१९९४ : वसंतशांताराम देसाई नाटककार, साहित्यिक
१९८२ : हरिभाऊ देशपांडे - नामवंत कलाकार
१९८० : संजय गांधी - इंदिरा गांधी यांचा मुलगा (जन्म: १४ डिसेंबर १९४६)
१९५३: श्यामा प्रसाद मुखर्जी - भारतीय जनसंघाचे संस्थापक (जन्म: ६ जुलै १९०१)
१९३९ : गिजुभाई बधेका आधुनिक बालशिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते (जन्म: १५ नोव्हेंबर १८८५)

# मूळव्याधी (पाईल्स) वर सुटकारा मिळवण्यासाठी घरगुती उपाय

एका अध्ययनात किमान 50 टक्के लोकांना 50 वर्षाच्या वयापर्यंत पाईल्स होण्याची शक्यता असते. ही एक सामान्य आजार आहे ज्याचा संक्रमण पसरत नाही. पाईल्सवर उपचार असतो पण लोकांना डॉक्टरकडे जाण्यास थोडी शरम वाटते.

हा आजारपण वाढल्याने त्यातून रक्त येऊ लागत आणि फार दुखू लागत ज्यामुळे बसायला त्रास होतो. यासाठी आम्ही तुम्हाला काही घरगुती उपचार सांगत आहोत, ते केल्याने नक्कीच आराम मिळेल.

कोमट पाण्याने स्नान : दिवसातून तीन वेळा गरम पाण्याने स्नान करावी किंवा पाण्यात थोड्यावेळासाठी बसावे. त्या जागेवरची त्वचा ठीक होईल आणि जळजळ देखील कमी होण्यास मदत मिळेल.*

संतुलित आहार घ्या : पाईल्स बरे करण्यासाठी सर्वात आधी तुम्हाला संतुलित आहार घेणे सुरू केले पाहिजे. ज्यामुळे कब्ज व पोटदुखी इत्यादीची समस्या दूर होते. जेवणात हिरव्या भाज्या,



पाले भाज्या, ब्राउन राईस, दूध, सुजी इत्यादीचे सेवन करा.

बर्फाचा शेक द्या : ज्या भागात जळजळ होत असेल, तेथे बर्फाचा तुकडा ठेवा, याने आराम मिळेल व सूज कमी होण्यास मदत मिळेल.

एलोवेरा: पाईल्स झाल्यावर एलोवेरेला कापून आतला गर त्या जागेवर लावल्याने फायदा होतो. याचे जेल, जळजळ शांत करतो आणि सूज देखील कमी करण्यास मदत करतो.

लिंबाचा रस : तुम्हाला हे ऐकून आश्चर्य होईल, पण पाईल्स झाल्यावर लिंबाचा रस त्या जागेवर लावल्याने फार फायदा होतो. सुरुवातीत जळजळ होते पण थोड्यावेळाने आराम मिळतो.

जैतूनाचे तेल : जैतूनाचे तेल फारच उपयोगी असत. यात एंटीऑक्सीडेंट असत जे त्वचेची जळजळ शांत करत. पाईल्स झाल्यावर कॉटन बॉलमध्ये तेल घेऊन प्रभावित जागेवर लावायला पाहिजे. याने आराम मिळेल.

इतर प्राकृतिक उपाय: बऱ्याच वेळेपर्यंत ऐकाच मुद्रेत बसून राहणे टाळावे. व्यायाम करावा आणि रक्त आल्यावर लगेचच डॉक्टरांना सल्ला घ्यावा.

## राशि भविष्य

**मेष** : शारीरक व्याधीपासून मुक्तता होण्याची शक्यता आहे. हुशारीने गुंतवणूक करा. एखाद्या धार्मिक स्थळी किंवा एखाद्या नातेवाईकाच्या घरी जाण्याचा विचार पुढे येईल. प्रेम प्रकरणात तुमच्याबद्दल गैरसमज होईल. व्यवसाय-धंद्यामध्ये नव्या संकल्पनांना सकारात्मक आणि ताबडतोब प्रतिसाद द्या.

**वृषभ** : आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगला दिवस. तुमचे उल्हसित मन तुम्हाला योग्य ती ऊर्जा पुरवेल आणि आपणास आत्मविश्वास मिळवून देईल. संयुक्त प्रकल्पात आणि संशयास्पद आर्थिक योजनांमध्ये गुंतवणूक करू नका. एखाद्या जुन्या मित्राच्या फोन मुळे सायंकाळ स्मरणरंजनात व्यतीत होईल.

**मिथुन** : क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन तुम्ही शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहाल. दिवसाच्या उत्तरार्धात आर्थिक स्थिती सुधारेल. कुटुंबियांच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत, यासाठी तुम्ही तुमच्या रागावर नियंत्रण ठेवा. राग हा केवळ काही काळापुरता केलेला वेडेपणा असतो आणि त्यामुळे तुमच्या हातून काही मोठ्या चुका घडू शकतात, याची जाणीव ठेवा.

**कर्क** : परिस्थितीवर तुमचे नियंत्रण आले की तुमची चिंता नाहिशी होईल.साबणाच्या फुग्याला स्पर्श करताच तो जसा फुटून जातो तसेच हे असल्याचे तुमच्या लक्षात येईल जर तुम्ही आपल्या घरातील व्यक्तीकडून काही उधार घेतले असेल तर, आज त्यांना ते परत करा अथवा तुमच्या विरुद्ध ते कोर्टात कार्यवाही करू शकतात.

**सिंह** : संयम बाळगा, आपले निंरतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. तुमच्या पैशामुळे आज अनेक समस्या निर्माण होतील - तुमचा खर्च खूप अधिक होईल किंवा तुमचे पाकीट हरवेल - निष्काळजीपणामुळे काही तोटा निश्चितपणे होईल.

**कन्या** : तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च असेल. हुशारीने गुंतवणूक करा. दूरवर राहणारे नातेवाईक आज तुमच्याशी संपर्क साधतील. तुमच्या हृदयाला आवाहन करतील अशा एखाद्या व्यक्तीशी बेट होण्याचा जबरदस्त योग आहे. कामकाजाच्या ठिकाणी होणा-या बदलांमुळे तुम्हाला फायदा होईल.

**तूळ** : तुमच्या मनावर ग्रासलेला विषाद काढून टाका - त्यामुळे तुमच्या प्रगतीत अडसर निर्माण झाला आहे. चढउतारांमुळे फायदा होईल. तुमचा मोकळा वेळ मुलांच्या सहवासात घालवा - मग त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा वेगळी क्लृप्ती करावी लागली तरी चालेल. प्रेमच प्रेम चोहीकडे, अशी तुमची स्थिती आहे.

**वृश्चिक** : आपल्या आरोग्याची उगाच चिंता करु नका, त्यामुळे आपला आजार बिघडण्याची शक्यता आहे. गुंतवणूक करणे श्रेयस्कर आहे, पण त्यासाठी योग्य सल्ला घ्यावा. कुटुंबियांनी दिलेला चांगला सल्ला आज तुमच्यासाठी लाभदायक फळ देणारा असेल. प्रेम प्रकरणामध्ये स्वत:हून यशस्वी होण्यासाठी एखाद्याला निर्देशन करा.

**धनु** : संयम बाळगा, आपले निंरतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. आज तुम्ही त्या लोकांना उधार देऊ नका ज्यांनी तुमची मागील उधारी चुकवलेली नाही. तुमच्यातील लहान मूल जागे होईल आणि तुमची निष्पाप वागणूक यामुळे कुटुंबातील समस्या सोडविण्यात तुम्ही महत्त्वाची भूमिका बजावू शकाल.

**मकर** : दुसऱ्यांवर टीका करण्याच्या सवयीमुळे तुम्हालाही टीका सहन करावी लागेल. तुमची विनोदबुद्धी जागृत ठेवा आणि बचावात्मक पवित्रा घेऊ नका आणि तसे केले तर गुप्तपणे केल्या जाणाऱ्या तुमच्यावरील शेरेबाजीलाही तुम्ही निष्प्रभ करू शकाल. तुमचा शेजारी आज तुमच्याकडून धन उधार मागण्यास येऊ शकतो.

**कुंभ** : आजच्या दिवशी तब्येत एकदम उत्तम असेल. जीवनसाथी सोबत पैश्याने जोडलेल्या कुठल्या मुद्यांना घेऊन आज वाद होण्याची शक्यता आहे. आज तुमच्या व्यर्थ खर्चावर तुमचा साथी तुम्हाला लेक्चर देऊ शकतो. दिवसाच्या उत्तरार्धात होणारी एखाद्या जुन्या मित्राची भेट उल्हसित करेल.

**मीन** : तुमची कमकुवत इच्छाशक्ती यामुळे तुम्ही भावनिक व मानसिकदृष्ट्या कमजोर बनू शकाल. तुम्हाला अफलातून नव्या संकल्पना सुचतील ज्यामुळे आर्थिक फायदा संभवतो. तुमचे ज्ञान आणि विनोदबुद्धी यामुळे तुमच्या अवतीभवतीचे लोक प्रभावित होतील.

# घाटकोपर होर्डिंग दुर्घटना : होर्डिंगला परवानगी देणाऱ्या IPS अधिकाऱ्याच्या पत्नीचं कनेक्शन? अनोळखी खात्यातून व्यवहार

● मुंबई - वादळी वाऱ्यामुळे घाटकोपरमध्ये महाकाय जाहिरात फलक कोसळला होता. या अपघातात १७ मुंबईकरांचा हाकनाक बळी गेला. याप्रकरणी फलक लावलेल्या जाहिरत कंपनीच्या व्यवहाराचा तपास मुंबई पोलिसांकडून करण्यात येतोय. या तपासादरम्यान, तत्कालीन रेल्वे पोलीस आयुक्त कैसर खालिद यांच्या पत्नी सुमन्ना कैसर खालिद यांचंही नाव आता समोर आलं आहे. सुमन्ना यांच्या व्यावसायिक सहकाऱ्याने लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचं समोर आलं आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाला (एसआयटी) असे आढळून आले आहे की, "बेकायदा १४०*१२० फूट होर्डिंगची मालकी असलेल्या इगो मीडिया प्रायव्हेट लिमिटेडने २०२१ ते २०२२ दरम्यान १० वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये ३९ व्यवहारांद्वारे ४६.५ लाख रुपये पाठवले आणि सर्व अर्शद खान नावाच्या एका व्यक्तीने ते पैसे घेतल्याचे समोर आले आहे.

द इंडियन एक्स्प्रेसने ॲक्सेस केलेले रजिस्ट्रार ऑफ कंपनी (आरओसी) रेकॉर्ड दाखवतात की अर्शद खान हे महपारा गारमेंट्स प्रायव्हेट लिमिटेडमध्ये सुमन्ना केसर खालिद यांच्यासह सह-संचालक आहेत. कैसर खालिद यांनी निविदा जाहीर न करता होर्डिंगला परवानगी दिली होती. रेकॉर्डवरून असेही दिसून आले आहे की दोघांची (अर्शद खान आणि सुमन्ना खालिद) २८ जून २०२२ रोजी मुंबईस्थित कंपनीचे संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. इंडियन एक्स्प्रेसने होर्डिंगसाठी मंजुरीबद्दल प्रतिक्रियेसाठी खालिद यांच्याशी संपर्क साधला होता. परंतु, त्यांनी यावर भाष्य करण्यास नकार दिला. मात्र, "तीन होर्डिंगसाठी इगो मीडिया कंपनीला कंत्राट देण्यात आलं होतं. तर, चौथ्या होर्डिंगसाठी जो कोसळला होता, त्याची औपचारिक निविदा प्रक्रिया न करता इगो मीडियालाच त्याच अटी आणि शर्तींवर कंत्राट देण्यात आलं", असं खालिद यांच्या जवळच्या सूत्राने म्हटलं आहे. एसआयटीच्या तपासावर देखरेख करणारे मुंबई पोलीस गुन्हे शाखेचे डीसीपी विशाल ठाकूर यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनीही या तपासावर भाष्य करण्यास नकार दिला. परंतु, पोलीस सूत्रांनी सांगितले की, "कंपनीशी कथितपणे लिंक नसलेल्या व्यक्तींच्या बँक खात्यांमध्ये इगो मीडियाने पाठवलेल्या पैशांचाही तपास केला जाणार आहे."

"गेल्या काही वर्षांमध्ये इगो मीडियाने केलेल्या व्यवहारानुसार एसआयटीला कंपनीशी कोणत्याही प्रकारे संबंधित नसलेल्या व्यक्तींचे एकूण ४६.५ लाख रुपयांचे ३९ व्यवहार आढळून आले. या प्रकरणातील आरोपी भावेश भिंडे आणि कंपनीतील इतरांना विचारले असता त्यांनी सांगितले की, अर्शद खानने त्यांना धनादेश प्राप्तकर्त्यांची नावे न सांगता देण्यास सांगितले होते. नंतर, कंपनीला सुमारे १० खात्यांमध्ये धनादेश जमा झाल्याचे आढळले", सूत्रांनी सांगितले.

"एसआयटीने नंतर खातेदारांशी संपर्क साधला असता ते आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याचे आढळून आले. शिवाजी नगरमध्ये राहणारा अर्शद खान हा त्यांच्या ओळखीचा असून पैसे ट्रान्सफर करण्यासाठी त्याने त्यांच्या बँक खात्यांची माहिती मागितल्याचे त्यांनी सांगितले. हे पैसे अखेर अर्शद खानने स्वतःच काढले, असेही त्यांनी सांगितले. त्यांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत, असे सूत्रांनी सांगितले.

एसआयटी आता अर्शद खान, कैसर खालिद आणि इगो मीडिया यांच्यातील कथित संबंधांची चौकशी करत आहे, असे सूत्रांनी सांगितले. सूत्रांनी सांगितले की, "या प्रकरणावर स्पष्टता येण्यासाठी टीम सर्व संबंधितांचे जबाब नोंदवेल. एसआयटी इगो मीडिया आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अभियंता यांच्यातील कथित संबंधांची चौकशी करत आहे, ज्याने कंपनीला बीएमसीच्या कायदा विभागाकडून होर्डिंगवर "अनुकूल अहवाल" देण्याचं आश्वासन दिलं होतं.



### होर्डिंगा बेकायदा असल्याचे सांगणाराही भावेश भिंडेच्या संपर्कात

■ होर्डिंग बेकायदेशीर असल्याचे घोषित करणारा अभियंताही भावेश भिंडेच्या संपर्कात होता हेही पुढे स्पष्ट झाले आहे. या अभियंताने खासगी चिट फंडातून ४५ लाखाचे असुरक्षित कर्ज देण्यास भिंडेला मदत केली होती", असंही सूत्रांनी सांगितले.

### पालिकेच्या नोटीसचीही चौकशी होणार

■ एसआयटीला असेही आढळले आहे की होर्डिंग कोसळल्यानंतर लगेचच, स्थानिक बीएमसी वॉर्ड ऑफिसने १३ मे रोजी संध्याकाळी ६.१५ च्या सुमारास इगो मीडियाला नोटीस पाठवली आणि एकूण ६.१४ कोटी रुपयांची थकबाकी भरण्याची मागणी केली. एसआयटी नोटीसच्या वेळेची तपासणी करत आहे. तसंच, या प्रकरणात आणखी अटक होण्याची शक्यता आहे.

# पोस्को कंपनीचा अनोखा उपक्रम श्रृंखला संस्थेच्या माध्यमातून करणार ३२ गावाचा प्लास्टीक कचरा साफ

● इंदापूर - माणगांव तालुक्यात विळे भागाड येथील नामांकित पोस्को स्टील कंपनी ही गेल्या अनेक वर्षा पासून जिल्हा साठी तालुक्यासाठी तसेच विळे भागाड या परिसरातील गांवान साठी व सर्वसामान्य नागरिकांन साठी नवनवीन लोक उपयोगी उपक्रम रांबवतअसून पोस्को कंपनीच्या या उपक्रमा बाबत आज सर्वानाच आज आदर भाव वाटताना दिसत आहे.



तसेच अशाच प्रकारे पोस्को कंपनीने शुक्रवार दि २१ जून २०२४ रोजी एका नवीन उपक्रमाचा संकल्प करून घोषणा केली असून प्रथम विळे भागाड एम.आय.डी.सी मधील एकून तीस ते बत्तीस गांवे ही प्लास्टिक मुक्त करण्याचा संकल्प त्यांनी श्रृंखला या संस्थेच्या माध्यमातून करणार असल्याचे सांगितले यावेळी श्रृंखला या संस्थेच्या सिईओ अस्मिता शर्मा यांनी प्लास्टिक कच-या मुले मानव,पशू,पक्षी,मासे,निसर्ग याना कशा प्रकारे प्लास्टिक पासून हाणी होते हे आपल्या मार्गदर्शनात सांगितले.तसेच विळे भागाड परिसरातील हा प्लास्टिकचा कचरा रायगड जिल्हा परिषदेच्या एकूण तिस ते बत्तीस मराठी शाळांच्या माद्यमातून गोळा केला जाणार असून पोस्को कंपनी या शाळान कडून हा कचरा दर आठवड्याला घेऊन जाऊन तो श्रृंखला या संस्थेला देणार असून पोस्को कंपनीचा हा अनोखा प्लास्टिक कचरा संकलित करण्याच्या उपक्रमाची सुरवात ही राजिप शाळा भागाड येथून झाली असून यावेळी विद्यार्थी,पालक तसेच शिक्षक यांच्याकडून या प्लास्टिक कचरा संकलन करण्याच्या उपक्रमा बाबत चांगल्या प्रकारे प्रतिसाद भेटत असून यावेळी रायगड जिल्हा परिषदच्या अधिकारी शुभांगी नाखले,जयवंत गायकवाड,पोस्कोचे अधिकारी महेंद्र तट्टे,कुलदिप पुरंदरे,स्वप्नील पाटील,तसेच शिक्षक वर्ग पालक वर्ग व माणगांवचे पत्रकार बांधव या कार्यक्रमाला मोठ्या संखेने उपस्थित होते.

# मोबाईल नेटवर्क नसल्याने नागरीकांच्या दैनंदिन जीवनात मोठे अडथळे

● तळा - तळा तालुक्यात मोबाईल नेटवर्क नसल्याने खेडोपाडी काय, अन तालुक्यातील तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय इथे नागरीकांच्या जिओ, वोडाफोन, एअरटेल, अशा मोबाईल लाही नेटवर्क नसल्याने नागरीकांच्या दैनंदिन जीवनात कामामध्ये मोठे अडथळे निर्माण झाले आहेत.

या तालुक्याची निर्मिती झाल्यापासून ही अशी परिस्थिती मग मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया ही केन्द्र सरकारच्या घोषणेचे काय झाले? असा प्रश्न नागरीकांना पडला आहे. सगळया बाबी ऑनलाईन झाल्या मग नागरीकांच्या गावात नेटवर्क नसल्याने संभाषण, अधिकारी कर्मचारी यांना फोन लागत नाही. मग आमच्या नागरीकांच्या समस्या चुटकीसरशी कशा सुटणार त्याचबरोबर या कार्यालय आल्यावर आपल्या काही बाबतीत घरी कॉन्टॅक्ट कसा व्हायचा कसा करायचा हा प्रश्न नागरीकांना सतावत आहे. इथल्या व्यवस्थेने याबाबत कधी नागरीकांच्या या समस्या जाणुन घ्यायचा प्रयत्न केला का? याचा उत्तर नाही असेच असेल. उलट नागरीकांना अधिकारी व कर्मचारी यांच्या शी संभाषण न होणे म्हणजे विकासाला खिळ बसणे किंवा कामाला गती न मिळणे अस समिकरण जमले आहे. यावरून लक्षात येते की हा तालुका फक्त भौतिक सुविधा गावागावात घेऊनच समाधानी बनुन राहीला आहे. उलट पक्षी सामान्य नागरीकांच्या वैयक्तिक कामासाठी त्यांना आपल गाव ते तालुका अशी ही फेरी सातत्याने करावी लागते. आणि आलो तर नेटवर्क नाही. नेटवर्क आहे तर संबधित अधिकारी नाही. अशा विचित्र अडचणी भोगत येथील नागरीक कसाबसा जिवन जगताना दिसत आहे.

# Nirmala Sitharaman Chairs Pre-Budget Meeting With States Finance Ministers, UTs

● New Delhi - Union Finance Minister Nirmala Sitharaman on Saturday morning chaired a pre-budget meeting with Finance Ministers of all States and Union Territories. The Pre-Budget Meeting is organised by the Ministry of Finance and Corporate Affairs with Finance Ministers of all the States and Union Territories (with Legislature) to take suggestions for the upcoming Union Budget 2024-25.



Ministers of State along with other stakeholders are participating in the meeting and visuals showed Uttar Pradesh Finance Minister Suresh Kumar Khanna, and Finance Minister of Rajasthan Diya Kumari at the Bharat Mandapam venue before the meeting commenced this morning. The Union Finance Ministry had begun consultations on the budget a few days ago with different stakeholders of the economy. Sitharaman has met economists, finance and capital market experts and industry bodies. Sitharaman chaired the first pre-budget consultations with leading economists on June 19. The meeting was attended by Union Minister of State for Finance Pankaj Chaudhary, the finance secretary, secretaries of the departments of economic affairs, revenue, financial services and corporate affairs and the chief economic adviser. Meanwhile, Sitharaman will also chair the 53rd Goods and Services Tax (GST) Council Meeting scheduled in the second half of the day.

This is the first meeting of the GST Council after the formation of the new government. State finance ministers will also be present at the 53rd meeting of the Goods and Services Tax Council. As is the norm, the GST Council gets together to discuss issues pertaining to the GST regime, such as tax rates, modifications to policies, and administrative challenges.

# हत्तीरोगींना मिळणार दिव्यांग प्रमाणपत्र

## रायगड जिल्हयात हत्तीरोगाचे २२९ रुग्ण अलिबाग,पनवेल मध्ये सर्वाधिक

● अलिबाग - हत्तीरोग हा डास चावल्याने जंतू संसर्गामुळे होतो. दुर्लक्षित असलेल्या या आजाराच्या ठराविक वृध्दीनंतर रुग्णांच्या हालचालींवर कमालीची बंधने येतात. त्यामुळे तो मुक्तपणे हिंडू- फिरु शकत नाही. अशा रुग्णांना आधार देण्यासाठी राज्य शासनाने हत्तीरोग दूरीकरण कार्यक्रमाअंतर्गत दिव्यांग प्रमाणपत्र देण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे हत्तीरोगींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणार आहे. रायगड जिल्हयात हत्तीरोगाचे २२९रुग्ण आहेत. सर्वाधिक रुग्ण अलिबाग आणि पनवेल तालुक्यात आहेत.

हत्तीरोग हा सामाजिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आजार आहे. हत्तीरोगाच्या रुग्णांच्या पायावर सूज येऊन हालचालींवर एका प्रकारचे निर्बंध येतात. इतरांच्या मदतीशिवाय हे रुग्ण हालचाल करु शकत नाही. पायावर सूज येणे, ताप येणे, पाय लालबुंद होणे, पायाच्या दोन बोटांमध्ये चिखल्या आजाराप्रमाणे जखमा होणे अशी टप्प्याने रुग्णांत लक्षणे दिसून येतात. पायाच्या सूजेवरुन तीव्रता तपासून दिव्यांग प्रमाणपत्र वितरित करण्याचे आदेश राष्ट्रीय आरोग्य अभियानच्या संचालकांनी दिले आहेत.



राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या हत्तीरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात २२९रुग्ण आहेत. ४० टक्केपेक्षा जास्त अपंगत्व आलेल्या हत्तीरोग रुग्णांना दिव्यांग प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यासाठी रुग्णांनी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मदतीने गावातील कॉमन सर्व्हिस सेंटरवर जाऊन संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. सीएससी सेंटरवर ऑनलाईन अर्ज करण्यासाठी रुग्णास आधार कार्ड, रेशन कार्ड, दोन पासपोर्ट फोटो या कागदपत्रांसह रक्त गट, मोबाईल क्रमांक देणे आवश्यक आहे. शिबिरास येताना ऑनलाईन केलेल्या अर्जाची प्रत सोबत आणणे गरजेचे आहे.

### रायगडमधील हत्तीरोग रुग्णांची संख्या

■ अलिबाग- ५६, उरण- ३१, पनवेल- ४७, कर्जत- ७, खालापूर- ९, सुधागड- ५, पेण - २८, मुरुड- १२, रोहा- ११, माणगाव- १२, तळा- १, म्हसळा- १, श्रीवर्धन- १, महाड- ४ , पोलादपूर- ४, एकूण- २२९.

### डास चावल्यामुळे हत्तीरोग

■ 'क्युलेक्स' प्रजातीच्या डासांपासून हत्तीरोग पसरतो. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार क्लुलेक्स डास हत्तीरोगास कारणीभूत 'बुचेरिया बॅनक्रॉफ्टीया' या परजीवी जंतूंचा प्रसार करतात. क्लुलेक्स प्रजातीचे डास हत्तीरोगासाठी कारणीभूत 'बुचेरिया बॅनक्रॉफ्टीया' या परजीवी जंतूंचे वाहक असतात. हा परजीवी वाहक डास मानुष्याला चावल्यानंतर हत्तीरोगाचे जंतू माणसाच्या शरीरात सोडतो. माणसाच्या शरीरात हे जंतू चावलेल्या ठिकाणाहून किंवा अन्य ठिकाणाहून त्वचेतून शरीरात प्रवेश करतात. हत्तीरोगाच्या जंतूंनी शरीरात प्रवेश केल्यानंतर मायक्रोफायलेरिया रक्तात सापडण्याच्या निश्चित कालावधीबाबत माहिती नाही. पण, हत्तीरोगाच्या जंतूंनी शरीरात प्रवेश केल्यानंतर लक्षणं दिसून येण्यासाठी साधारणत: ८ ते १६ महिन्यांचा कालावधी लागतो.

# 'Was Left With No Choice But To...': Atishi As Her Hunger Strike Over Delhi Water Crisis Enters Day-2

● Delhi - As Delhi continues to battle the water crisis amid the sorching heat, Delhi's Water Minister and AAP leader Atishi, who is currently on an indefinite hunger strike over the issue, said on Saturday that she will continue her fast until Haryana Government supplies water to the national capital and 28 lakh people of the city get access to water.




The Delhi Minister said that the city receives a total of 1005 MGD of water from its neighbouring states and out of the total water supply 613 MGD of water comes from Haryana. She claimed that Haryana has been releasing only 513 MGD of water for the past several weeks.

"I was left with no choice but to sit on a fast...Even today, the situation of water crisis persists," Atishi said on the second day of her indefinite hunger strike.

"This is the second day of my fast. There is an acute shortage of water in Delhi... Delhi receives water from its neighbouring states. Delhi receives a total of 1005 MGD of water that is supplied to the houses in Delhi. Of this, 613 MGD of water comes from Haryana but for the past several weeks, it has been releasing only 513 MGD...Due to this more than 28 lakh people in Delhi are not receiving water...I tried everything but when Haryana Government didn't agree to supply water, I was left with no choice but to sit on a fast...Even today, the situation of water crisis persists," Atishi said.

"Yesterday, Haryana supplied 110 MGD lesser amount of water (than the designated)...I will continue my fast until Haryana Government supplies water to Delhi, until 28 lakh people of Delhi get water," she further stated. Atishi sat on an indefinite hunger strike on Friday, alleging that the Haryana government is not releasing the capital's share of water. She was accompanied by AAP leader Sanjay Singh and other members of the party at Bhogal, near Jangpura where she sat on an indefinite hunger strike.

# Hoax Bomb Threat To Air Arabia Flight In Kerala's Calicut Airport



● Kozhikode (Kerala): A hoax bomb threat was made with regard to an Air Arabia flight scheduled to leave for Sharjah from the Calicut International Airport on Saturday morning, leading to the aircraft being grounded while the bomb detection squad of the police inspected it, airport sources said.

One of the passengers who arrived on the aircraft from Sharjah to Calicut had left a note saying 'bomb' on one of the seats and it was found by the ground staff before boarding commenced, a senior airport official said.

Subsequently, the police were alerted, the aircraft was grounded and the bomb detection squad carried out a thorough inspection of the plane, the official said.

"It was later found that the note was a hoax bomb threat. The inspection and security drills have just been concluded. We are awaiting a report from the bomb detection squad before the flight is cleared for take off," the official said around 11 am. He also said that the flight, which was scheduled to depart around 8.30 am, will now leave at around 5 pm.

# कर्नाटकमध्ये राहणाऱ्यांनी कन्नड शिकावी - मुख्यमंत्री सिद्धरामय्या



● कर्नाटक, प्रतिनिधी :

महाराष्ट्रात मराठी भाषेचे पतन होत असताना इतर राज्य मात्र त्यांची भाषा जतन करण्यासाठी पुढाकार घेताना दिसत आहेत. कर्नाटक हे राज्य मातृभाषेसाठी पूर्वीपासून आग्रही असल्याचे अनेकदा दिसले आहे. सीमावर्ती भागातील मराठी बांधवांनी कन्नडमध्येच व्यवहार करावेत, यासाठीही अनेकदा तिथे संघर्ष उडालेला आहे. आता कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी कन्नडीगांसाठी केलेले एक आवाहन चर्चेचा विषय ठरत आहे. कन्नडीगांनी आपल्या भाषेचा अभिमान बाळगला पाहीजे. यासाठी राज्यातील प्रत्येकाने कन्नडमध्येच बोलले पाहीजे, इतर दुसऱ्या भाषांचा वापर करू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. कर्नाटक विधिमंडळाच्या पश्चिम द्वाराजवळ उभारण्यात आलेल्या नाददेवी भूवनेश्वरी मातेच्या पुतळ्याचे उद्घाटन करत असताना मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी कन्नड भाषेबद्दल आपले विचार व्यक्त केले.

"कर्नाटकमध्ये राहणाऱ्या प्रत्येकाने कन्नडमध्येच बोलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कन्नड वगळता इतर कोणतीही भाषा बोलली जाणार नाही, अशी शपथ सर्वांनी घ्यावी. कन्नड लोक उदार असल्यामुळेच आता इतर भाषा बोलून आपण कर्नाटकमध्ये राहू शकतो, असे वातावरण निर्माण झाले आहे. हीच परिस्थिती तुम्हाला तमिळनाडू, आंध्रप्रदेश किंवा केरळ या राज्यात दिसणार नाही. तिथे फक्त त्यांच्या मातृभाषेत संवाद साधला जातो. त्यामुळे आपणही आपल्याच मातृभाषेत संवाद साधला पाहिजे.

# उमटे धरणाच्या भिंतीला पडलेल्या भगदाडाची होणार डागडुजी

## जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केली धरणाची पाहणी

● अलिबाग, प्रतिनिधी :

अलिबाग तालुक्यातील उमटे धरणाची दुरवस्था झाली आहे. धरणाच्या भिंतीला भगदाड पडले आहे. तसेच धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. या संदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतीच बैठक घेत धरणाचे मजबुतीकरण तसेच गाळ काढण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. यानुसार रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.



भरत बास्टेवाड यांनी शुक्रवारी (दि.२१) उमटे धरणाची पाहणी केली. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या सूचनांनुसार धरण मजबुतीकरण तसेच गाळ काढण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव राज्य शासनाला सादर करण्याचे निर्देश संबंधितांना दिले. तसेच या पाहणी दौऱ्यात उमटे धरणाच्या भिंतीला पडलेले भगदाडाची तातडीने डागडुजी करण्याच्या सूचना दिल्या. डागडुजीसाठी आवश्यक निधी जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

उमटे धरणाची निर्मिती १९७८ साली करण्यात आली. त्यानंतर १९९५ साली हे धरण जीवन प्राधिकरणाकडून रायगड जिल्हा परिषदेला हस्तांतरीत झाले. धरणाची साठवण क्षमता ८७ दशलक्ष घनफुट आहे.

# "गुजरात सरकार मला त्रास देतंय..."; TMC खासदार युसूफ पठाण यांची हायकोर्टात धाव!

● गुजरात, प्रतिनिधी :

टीएमसी खासदार आणि माजी क्रिकेटर युसूफ पठाण यांनी गुजरात सरकारकडून आपल्याला त्रास होत असल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, युसूफ पठाण यांना बडोदा महापालिकेकडून अतिक्रमणाची नोटीस मिळाली होती. त्यानंतर युसूफ पठाण यांनी हे आरोप केले आहेत. तसेच, याप्रकरणी युसूफ पठाण यांनी गुजरातउच्च न्यायालयातही धाव घेतली आहे. त्यामुळे आता गुजरात उच्च न्यायालयात महापालिकेला नोटीस पाठवून याबाबत स्पष्टीकरण मागवण्यात आले आहे.





काही दिवसांपूर्वी युसूफ पठाण यांना बडोदा महापालिकेची सरकारी जमीन रिकामी करण्याची नोटीस मिळाली होती. याबाबत युसूफ पठाण यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून २०१२ सालीच ही जागा घेण्यासाठी महापालिकेकडे अर्ज केल्याचे सांगितले. तसेच, २०१४ मध्ये महापालिकेने वेगळा प्रस्ताव आणून राज्य सरकारकडे पाठवला होता.याबाबत उच्च न्यायालयाने १० वर्षांपासून कोणतीच कारवाई का केली नाही, अशी विचारणा केली.

यावर युसूफ पठाण म्हणाले की, मी नुकताच लोकसभा निवडणुकीत निवडून आलो असून, मी दुसऱ्या पक्षातून निवडून आल्यामुळे मला त्रास देण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच, गेल्या १० वर्षांपासून काहीही केले नाही आणि अचानक निवडणूक निकालानंतर ६ जून रोजी नोटीस पाठवण्यात आली, असे युसूफ पठाण यांनी म्हटले आहे. ते पुढे म्हणाले की, महापालिकेच्या प्रस्तावानंतर तो पुन्हा राज्य सरकारकडे पाठविण्यात आला. त्याची गरज नव्हती, कारण ही जागा राज्य सरकारची नसून महापालिकेची आहे.

युसूफ पठाण यांच्यावर भाजपचे माजी नगरसेवक विजय पवार यांनी सरकारी भूखंड हडपल्याचा आरोप केला आहे. पवार यांच्या आरोपानंतर बडोदा महापालिकेने युसूफ पठाण यांनी नोटीस बजावली आहे. वडोदरा महानगरपालिकेने हा भूखंड युसूफ पठाणला देण्याचा निर्णय घेतल्याचा आरोप विजय पवार यांचा आहे. तसेच, याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवण्यात आला होता. मात्र राज्य सरकारने महापालिकेची शिफारस फेटाळून लावली होती. असे असतानाही युसूफ पठाणने भूखंड ताब्यात घेऊन घर बांधले. सध्या हा भूखंड युसूफ पठाणच्या ताब्यात आहे. अशा परिस्थितीत हे घर जमीनदोस्त करायला हवे, अशी मागणी भाजपच्या माजी नगरसेवकाची आहे.

# अपक्ष शिक्षक उमेदवार ज्ञानदेव हांडे यांचा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शिक्षक सेनेत प्रवेश

● मुंबई, प्रतिनिधी :

मुंबई शिक्षक मतदार संघाचे अपक्ष उमेदवार तथा महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष ज्ञानदेव हांडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला. सोबत राज्य सचिव भानुदास शिंदे, मुंबई प्रदेशाध्यक्ष मनोहर कदम, महिला अध्यक्षा अरुणा म्हात्रे, मुंबई सचिव दत्तात्रय शेंडकर, मुंबई मनपा अध्यक्ष विनोद यादव, ठाणे जिल्हा अध्यक्ष सुदाम भोजणे , प्रसिद्धी प्रमुख तथा सहसचिव अनिल चिकणे, कार्याध्यक्ष सुरेश जाधव, यादव शेळके यांसह शेकडो शिक्षक पदाधिकाऱ्यांसोबत



शिक्षक सेनेत जाहीर प्रवेश केला. शिवसेनेचे पुरस्कृत उमेदवार शिवाजी अज्ञान शेंडगे यांना प्रथम पसंतीचे मत देण्याचे आवाहन करत भरघोस मतांनी निवडून आणण्याचा विश्वास व्यक्त केला. या प्रवेशासाठी नगरसेवक किरण लांडगे, सचिन दादा जोशी, संजय मोरे, शितल म्हात्रे यांनी विशेष सहयोग केला.

२००५ पूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांची जुनी पेन्शन, अनुदान, सरसकट निवड श्रेणी, अतिरिक्त शिक्षक, कॅशलेस मेडिक्लेम, शिक्षण सेवक, खाजगी इंग्रजी शाळातील शिक्षकांचे किमान वेतन, सेवा संरक्षण असे अनेक निर्णय तातडीने घेण्याचे आश्वासने मुख्यमंत्री यांनी दिले. याप्रसंगी माजी खासदार राहुल शेवाळे , आमदार सदा सरवणकर, आमदार मंगेश कुडाळकर, यासंह आमदार, माजी आमदार, माजी नगरसेवक, शिवसेना नेते, उपनेते यासह शिवसेनेचे बहुसंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

# सोलापूर-पुणे-कल्याण बायपासवर तीन वाहनांचा विचित्र अपघात, दोन ठार, दोन गंभीर जखमी



● मुंबई, प्रतिनिधी :

राज्यात गेल्या काही दिवसांपासून अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. आता अहमदनगरमध्ये एक भीषण अपघाताची घटना घडली आहे. नगर शहराच्या बाहेरून जाणाऱ्या बायपासवर तीन वाहनांचा विचित्र अपघात झाला आहे. यात दोन जण ठार तर दोन गंभीर जखमी झाले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, सोलापूर-पुणे-कल्याण बायपासवर तीन वाहनांचा भीषण अपघात झाला. सुरुवातीला बायपासवर ट्रेलर आणि ट्रकची समोरासमोर धडक झाली. यानंतर अपघातग्रस्त ट्रेलरला एका कारने मागून धडक दिली.

या भीषण अपघातात ट्रेलर आणि ट्रक ड्रायव्हरचा जागीच मृत्यू झाला आहे. तर कारमधील दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना अहमदनगर जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातामुळे बायपास रोडवर काही काळ वाहतूक कोंडी झाल्याचे दिसून आले.

दरम्यान, अहमदनगर शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या एका इलेक्ट्रॉनिक दुकानाला लागली भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. अग्निशामन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले आहेत. नगर-मनमाड महामार्गावरील एका शॉपिंग कॉम्प्लेक्समधील दुकानाला आग लागली आहे. आग लागलेल्या दुकानाच्या आजूबाजूला दुकाने असल्यामुळे अग्निशामक दलाने तातडीने आग विझवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. आग नेमकी कशामुळे लागली? याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

# पुण्यात पुन्हा कोयता गँगचा धुमाकूळ

## पोलिसांच्या गाडीसह १५ ते २० वाहनांची तोडफोड, नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण

● पुणे, प्रतिनिधी :

पुण्यात कोयता गँगला पोलिसांचा धाक उरला नाहीये हे पुन्हा एकदा समोर आलंय. काल सिंहगड रोडवर आता वडगावशेरीच्या गणेशनगर कोयता गँगची दहशत पहायला मिळाली. पुण्यात कोयता टोळीने पोलिसांच्या गाडीसह १५ ते २० वाहनांची तोडफोड केली. पुण्यातील वडगाव शेरी परिसरातील गणेश नगरमध्ये ही घटना घडली. ६ कार, ४ रिक्षा, ३ दुचाकी आणि इतर वाहनांची कोयता गँगने तोडफोड केली. गुंडाने धुमाकूळ घालत कोयते आणि दगडांनी वाहनांची



तोडफोड केली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे.

वडगावशेरीच्या गणेशनगर परिसरात काल कोयता टोळीच्या गुंडाने धुमाकूळ घालत हातामध्ये कोयते आणि दगड घेत वाहनांची तोडफोड करत वाहनांची तोडफोड केल्याने परिसरातील नागरिक भयभीत झाले आहे. सलग पुण्यात दुसऱ्या दिवशी वाहनांची तोडफोड झाल्याने पोलिसांचा धाक उरला की नाही असा सवाल उपस्थित होत आहे. कालच सिंहगड रस्त्यावरील क्रिकेट वाडी या ठिकाणी कोयता टोळीने धुमाकूळ घालत वाहनांची तोडफोड केली होती. त्यानंतर मध्यरात्री चंदननगर परिसरातील वडगावशेरीत वाहनांची कोयता टोळीने तोडफोड केली आहे..

पुण्यातील किरकटवाडी परिसरात काल संध्याकाळी ७.३० ते ९ च्या दरम्यान दहा ते पंधरा गुंडांनी हवेत कोयते फिरवून आणि दगडफेक करून दहशत माजवण्याचा प्रयत्न केला होता. या टोळक्याने नागरिकांना जखमी करण्याचा प्रयत्न केला असून या घटनेत दगड डोक्याला लागल्याने एकजण गंभीर जखमी झाला आहे. हवेली पोलिसांनी या प्रकरणी नऊ जणांना ताब्यात घेतलं असून यात एका अल्पवयीन मुलाचा देखील समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. मुख्य आरोपी आणि इतर सात आरोपींवर कलम ३०७, ३५४, ३२३, ३२४, १४३ आणि इतर कलमांतर्गत हवेली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

गेल्या काही दिवसांपासून पुण्यात कोयता गँगचा धुडगूस पाहायला मिळतोय. गेल्या काही महिन्यांपासून गल्ली पासून दिल्लीपर्यंत एकच चर्चा पुण्यातील "कोयता गँग". पुणे शहरातील अनेक भागात तरुणांच्या टोळ्या हातात कोयता घेऊन दहशत माजवण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत.

# बांगलादेशच्या पंतप्रधान हसीना १५ दिवसांत दुसऱ्यांदा भारत दौऱ्यावर

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना शुक्रवारी (२१ जून) भारतात आल्या आहेत. त्या बिमान बांगलादेश एअरलाइन्समधून आपल्या लवाजम्यासह नवी दिल्लीतील पालम विमानतळावर दुपारी साडेतीनला उतरल्या. शेख हसीना दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. त्यांचा दोन आठवड्यांच्या आतच दुसऱ्यांदा भारत दौरा होत आहे. हसीना यांनी ९ जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या शपथविधी सोहळ्यासाठी नवी दिल्लीमध्ये हजेरी लावली होती. शेख हसीना यांच्या या भारत दौऱ्यात काय होणार आहे आणि हा दौरा दोन्ही देशांसाठी का महत्त्वाचा आहे, ते पाहूया.

हसीना यांनी काल शुक्रवारी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. त्या दोघांमध्ये दोन्ही देशांच्या द्विपक्षीय संबंधांवर सखोल चर्चा झाली. या भेटीबाबत माहिती देताना एस. जयशंकर यांनी शुक्रवारी 'एक्स'वर लिहिले आहे, "बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांची आज सायंकाळी भेट घेऊन आनंद झाला. त्यांनी भारताला दिलेल्या राजकीय भेटीतून उभय देशांतील घनिष्ठ आणि शाश्वत संबंध अधोरेखित होतात. दोन्ही देशांमध्ये असलेल्या विशेष संबंधांमध्ये अधिक प्रगती होण्यासाठी त्या करीत असलेले मार्गदर्शन वाखाणण्याजोगे आहे." आज शनिवारी (२२ जून) शेख हसीना यांना राष्ट्रपती भवनामध्ये औपचारिक स्वागत करण्यात येईल. इथेच त्यांची पंतप्रधान मोदींसमवेत भेट होईल. हैदराबाद हाऊसमध्ये पंतप्रधान मोदी आणि हसीना यांच्यामध्ये द्विपक्षीय औपचारिक चर्चा होईल. शेख हसीना पंतप्रधान मोदींबरोबर विविध धोरणात्मक विषयांवर सखोल चर्चा करतील, अशी शक्यता आहे. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, या



भेटीमध्ये दोन्ही देशांमधील विविध महत्त्वाच्या विषयांवरील करारांसंदर्भात ठोस निर्णय घेतले जातील, अशी अपेक्षा आहे. या द्विपक्षीय चर्चेमधून दोन्ही देशांमधील संबंध अधिक उंचीवर नेण्याचे प्रयत्न केले जातील. त्यामध्ये रस्ते, रेल्वे आणि ऊर्जेच्या दळणवळणासंदर्भातील योजनांच्या वाढीबाबतही चर्चा होईल.

नद्यांच्या पाणीवाटपाबाबत भारत आणि बांगलादेश या दोन देशांमध्ये अनेक दशकांपासून वाद सुरू आहे. दोन्ही राष्ट्रांमधील पाणीवाटपाच्या समस्यांवरील तोडग्यासाठी भारतासह बांगलादेशकडून प्रयत्न केले जात आहे. त्यामुळे या चर्चेमध्ये गंगा पाणीवाटप करारासंदर्भात, तसेच तीस्ता नदीच्या पाण्यासंदर्भातील वादावरही चर्चा होण्याची शक्यता आहे. बांगलादेशला तीस्ता नदीचा आपला भाग विकसित करायचा आहे. त्यासाठीदेखील ही चर्चा महत्त्वाची ठरणार आहे. तसेच बांगलादेशला भारताकडून कांदा, आले, तांदूळ व गहू यांचा स्थिर पुरवठा हवा आहे. अशा विविध विषयांवर महत्त्वाची चर्चा होण्याची शक्यता आहे. एकीकडे भारत आणि बांगलादेशदरम्यान वाहणाऱ्या गंगा व तीस्ता या दोन्ही नद्यांच्या पाणीवाटपावरून वाद आहे; तर दुसऱ्या बाजूला चीनने बांगलादेशला तीस्ता नदीच्या विकास प्रकल्पासाठी एक अब्ज डॉलर्सचा प्रकल्प हाती घेण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे चीन व बांगलादेशमध्ये होऊ घातलेल्या अशा प्रकारच्या प्रकल्पाबाबत भारताने सावधगिरी बाळगणे पसंत केले आहे. या विषयांशिवाय पंतप्रधान मोदी आणि शेख हसीना म्यानमारमधील परिस्थितीबाबतही चर्चा करण्याची शक्यता आहे, असे वृत्त हिंदुस्तान टाइम्सने दिले आहे. तसेच मोंगला बंदराच्या वापराबाबतही चर्चा होण्याची शक्यता आहे. हे बांगलादेशातील दुसरे सर्वांत मोठे बंदर आहे. भारत इराणच्या चाबहार बंदर किंवा म्यानमारच्या सित्तवे बंदराचा विकास करण्याचा विचार करीत आहे. या बंदराचा विकास करण्याच्या मोबदल्यात भारताला इराणमार्गे मध्य आशिया आणि युरेशियातील बाजारपेठ व्यापारासाठी लाभेल, असे सांगितले जाते. या भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील संरक्षणासंदर्भातील भागीदारी वाढविण्याबाबतही चर्चा केली जाऊ शकते. भारताने बांगलादेशला त्यांच्या संरक्षण क्षेत्रामध्ये विकास करण्यासाठी ५०० दशलक्षांचे कर्ज देण्याचा प्रस्ताव दिलेला आहे.

# राजू शेट्टी पुन्हा सक्रिय; शाहू जयंतीदिनी कागल ते कोल्हापूर कैफियत पदयात्रा काढणार

● कोल्हापूर, प्रतिनिधी :



लोकसभा निवडणुकीमध्ये दुसऱ्यांदा अपयश आले असले तरी त्यापासून खचून न जाता पुन्हा उभारी घेण्याच्या हालचाली स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी चालवले आहेत यातूनच त्यांनी आता राजर्षी शाहू महाराज जयंती दिली कागल ते कोल्हापूर कैफियत पदयात्रा आंदोलन करण्याची भूमिका शुक्रवारी पत्रकार परिषदेत मांडली.ऊस उत्पादक शेतकरी आणि शक्तीपीठ महामार्ग बाधित शेतकऱ्यांच्या हितासाठी २६ जून या राजर्षी छत्रपती शाहु महाराज जयंतीदिनी शेतकऱ्यांची कैफियत मांडण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने कागल ते कोल्हापूर अशी कैफियत पदयात्रा काढणार येणार असल्याची घोषणा शेट्टी यांनी केली.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने गेल्यावर्षी ऑक्टोंबर – नोव्हेंबरमध्ये ऊस उत्पादकांचया प्रश्नावर महामार्ग रोको आंदोलन केले होते, शेतकऱ्यांना एफआरपी देऊनही फायदा झाला होता, त्यामुळे तीन हजार रुपयांपेक्षा जासत पैसे दिलेल्या शेतकऱ्यांना शंभर रुपये प्रति टन मिळावेत तसेच तीन हजारापेक्षा कमी पैसे दिलेल्या शेतकऱ्यांना पन्नास रुपये द्यावेत, ही मागणी होती.